नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २७९ * * अकोला * शनिवार, दिनांक ५ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

## ७६ नवजात बालकांचा सुखरूप बचाव

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ४ :**
येथील जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये गुरुवारी दुपारी विजेच्या उपकरणांमध्ये झालेल्या बिघाडामुळे शॉर्टसर्किट होऊन धुराचे लोट बाहेर पडू लागले. नवजात अर्भकांच्या अतिदक्षता कक्षात घडलेल्या या घटनेमुळे घबराट पसरली. परंतु रुग्णालयातील ५० परिचारिकांनी जिवाची बाजी लावून ७६ नवजात बालकांना सुखरूपपणे वाचवले.

बालकांवर उपचार करण्यासाठी ५० क्षमतेचा नवजात बालकांसाठीचा अतिदक्षता कक्ष तयार करण्यात आला आहे. त्यात दुपारी विद्युत उपकरणांमध्ये बिघाड झाल्यामुळे अचानक आगीच्या ठिणग्या उडाल्या. मात्र, परिचारीकांनी ७६ बालकांना सुखरूप बाहेर काढले.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## हृदयहीन दीनानाथ रुग्णालय

पुण्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालय ज्या अपेक्षेने स्थापन करण्यात आलेले आहे. त्याच्या अगदी विरुद्ध हे रुग्णालय वागत आहे. या रुग्णालयासाठी पुणे शहरातील अत्यंत मौल्यवान अशी नऊ एकरांपेक्षा जास्त जागा फुकट देण्यात आलेली आहे. या रुग्णालयाला महानगरपालिकेचा कर भरावा लागत नाही. पाणी आणि विजेसह इतर अनेक सुविधा यांना नाममात्र दर पद्धतीने देण्यात आलेल्या आहेत. मात्र, आज घडलेली एक घटना इतकी भयानक आहे की, या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या सर्व सवलती काढून घेतल्या गेल्या पाहिजेत. अशी सगळ्या जनतेकडून मागणी होत आहे. या रुग्णालयाचे प्रशासन आता केवळ पैसा कमावण्यासाठी जे रुग्ण दाखल होतात. त्यांच्या सोबत अक्षरशा पैशांचा धंदा करते. या रुग्णालयाच्या एकूणच कारभारामुळे आजच एका गर्भवती महिलेला आपले प्राण गमवावे लागले. ज्या महिलेने दोन गोंडस जुळ्या मुलांना जन्म दिला. पण या मंगेशकर रुग्णालयाच्या मुजोर प्रशासनाने तनिषा भिसे या अभागी महिलेवर केवळ पैशांसाठी उपचार न केल्यामुळे त्या मातेचा मृत्यू झाला. रुग्णालयात दाखल करण्यासाठी आणि त्या गर्भवतीवर उपचार करण्यासाठी एकूण वीस लाख रुपये आणि तातडीने दहा लाख रुपये भरण्याची मागणी इथल्याच रुग्णालय प्रशासनाकडून करण्यात आली होती. या सामान्य कुटुंबाने सध्या तीन लाख रुपये देतो. उपचार सुरू करा अशी विनंती केली. मात्र तेथील मुजोर डॉक्टर्स आणि प्रशासनाने ही मागणी अजिबात मान्य केली नाही. रुग्णालयाच्या माणुसकीहीन वागणुकीने त्या महिलेला शेवटी स्वतःचे प्राण गमवावे लागले. दुसऱ्या रुग्णालयाकडे नेत असताना मध्येच त्या महिलेचा मृत्यू झाला. त्याआधी तिने दोन जुळ्या बाळांना जन्म दिला होता. परोपकारासाठी स्थापन झालेल्या आणि सरकारी योजनांची खिरापत खात असणाऱ्या रुग्णालयाची ही असंवेदनशील वागणूक खरोखरच अनाकलनीय आहे. गरिबांवर मोफत उपचार, साधारण परिस्थिती असलेल्या रुग्णांवर कमी खर्चात उपचार करणे. ही यांची प्राथमिक जबाबदारी होती. त्यामुळेच या ठिकाणी हे रुग्णालय झाले होते. ज्या महिलेचा मृत्यू झाला. तिचे पती सुशांत भिसे भारतीय जनता पक्षाचे आमदार गोरखे यांचे स्वीय सहायक आहेत. त्यामुळेच या अभागी महिलेच्या उपचारासाठी रुग्णालयाच्या प्रशासनाला मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षातून फोन सुद्धा केला गेला होता. त्या फोनवरून त्या महिलेवर उपचार करा असे सांगण्यात आले होते. पण रुग्णालयाच्या प्रशासनाने आपला मनमानी कारभार करून उपचार न केल्यामुळे दोन बाळांना जन्म दिलेल्या त्या अभागी महिलेला आपला जीव गमवावा लागला. ही फार मोठी शोकांतिका आहे. हे रुग्णालय ज्या उद्देशाने स्थापन झाले ते कार्य तर झालेच नाही. पण साध्या माणुसकीचे दर्शनही या रुग्णालयाच्या महामुजोर प्रशासनाला दाखविता आले नाही. अशा अनेक घटना या रुग्णालयात होतात. अशी बरेच दिवसापासूनची तक्रार आहे. त्यामुळे आता सरकारने या प्रकरणी गुन्हा दाखल करून संबंधित दोषींवर कायदेशीर कारवाई केलीच पाहिजे. या रुग्णालयाच्या सर्व सवलती काढून टाकल्या पाहिजेत. हृदयहीन दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या प्रशासनाला त्या महिलेच्या मृत्यू बाबत जबाबदार धरले पाहिजे. कारण या प्रशासनाने आणि त्यांच्या व्यवस्थेने हा एक प्रकारे मनुष्य वधाचा गुन्हाच घडवून आणलेला आहे. आजकाल सर्वच रुग्णालयात रुग्णाच्या जीवापेक्षा पैशाला महत्त्व दिले जाते. रुग्णालय म्हणजेच रुग्णांना लुटण्याचे सापळे झालेले आहेत, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. या प्रकाराची दखल अजून तरी सरकारने म्हणावी अशी घेतलेली नाही. लता मंगेशकर यांच्या पुण्याईने हे रुग्णालय इथे उभे झाले?. पण या रुग्णालयाच्या रुग्ण मानसिकतेमुळे ज्यांच्या नावाने हे रुग्णालय सुरू आहे. त्यांना किती वेदना होत असतील. खरे तर मंगेशकर कुटुंबीय हेच त्या रुग्णालयाचे कर्तेधर्ते आहेत. या रुग्णालयाच्या प्रशासनाच्या वागणुकीमुळे त्यांच्या म्हणजेच मंगेशकर कुटुंबीयांच्या कलेवर प्रेम करणाऱ्या कोट्यवधी लोकांना किती दुःख होत असेल. याची कल्पनाही करवत नाही. याचा सरळ अर्थ असा आहे की, देशातील अनेक रुग्णालये केवळ पैशासाठी माणूसकी विसरतात. त्याच रांगेत आता दिनानाथ रुग्णालय आलेले आहे. दीनांचा नाथ ठरणाऱ्या या रुग्णालयाचा तीव्र धिक्कार करून त्यांना शासनाकडून मिळणाऱ्या सर्व सवलती तात्काळ रद्द केल्या जाव्यात. खरोखर हृदयनाथ मंगेशकर यांना हृदय असेल. तर त्यांनी रुग्णांच्या काळजीची लता आमच्या मनात आहे आणि त्यासोबतच तशीच आशा आम्ही बाळगतो. ही खात्री उद्याच्या उषेला दाखवली पाहिजे आणि आपल्या माईंचे आशीर्वाद घेतले पाहिजेत. अधिक काय लिहावे!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# वक्फ दुरूस्ती विधेयक राज्यसभेतही उमटली मंजूरीची मोहर

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :**
१२ तासांहून अधिक काळ चाललेल्या चर्चेनंतर गुरुवारी रात्री उशिरा राज्यसभेत वक्फ दुरुस्ती विधेयकही मंजूर करण्यात आले. विधेयकाच्या बाजूने १२८ तर विरोधात ९५ मते पडली.
बुधवारी याआधी लोकसभेत १२ तासांच्या चर्चेनंतर हे विधेयक मंजूर झाले. आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे जाईल. त्यांची मान्यता मिळाल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर होणे ही एक मोठी सुधारणा असल्याचे म्हटले. त्यांनी शुक्रवारी सकाळी रोजी लिहिले की या कायद्यामुळे पारदर्शकता वाढेल आणि गरीब-पसमंड मुस्लिमांच्या हक्कांचे रक्षण होईल.
पंतप्रधान मोदी म्हणाले, वक्फ मालमत्तांमध्ये वर्षानुवर्षे अनियमितता होती, ज्यामुळे विशेषतः मुस्लिम महिला आणि गरिबांचे नुकसान झाले. या नवीन कायद्यामुळे ही समस्या सुटेल.

### राष्ट्रपतींच्या संमतीनंतर बनणार कायदा



सुधारित विधेयकात मुस्लिमांच्या धार्मिक कार्यात कोणताही बिगर मुस्लिम हस्तक्षेप करणार नाही. गरीब मुस्लिमांना न्याय मिळवून देणे हा आमचा उद्देश आहे.
किरेन रिजीजू
केंद्रीय मंत्री

यापूर्वी, विधेयकावरील चर्चेदरम्यान, बिजू जनता दलाने (बीजेडी) आपल्या खासदारांसाठी व्हीप जारी केला नव्हता. पक्षाने म्हटले होते की खासदारांनी त्यांच्या विवेकाचे ऐकावे आणि वक्फ विधेयकावर निर्णय घ्यावा.

अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, विस्तृत चर्चेनंतर तयार केलेले विधेयक जेपीसीकडे पाठवण्यात आले आहे. लोकसभेत हे विधेयक मंजूर झाले. सुधारित विधेयकात, आम्ही पारदर्शकता, जबाबदारी आणि अचूकतेवर लक्ष केंद्रित करून बदल केले आहेत. जर आपण वक्फ विधेयकाचा मूळ मसुदा आणि सध्याचा मसुदा पाहिला तर आपण अनेक बदल केले आहेत.

# मनोज कुमार यांचे निधन

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**
अभिनेता मनोज कुमार यांचे शुक्रवारी सकाळी मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. शनिवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.



मनोज कुमार यांना भारत कुमार म्हणूनही ओळखले जात असे. उपकार, पूरब-पश्चिम, क्रांती, रोटी-कपडा और मकान हे त्यांचे यशस्वी चित्रपट होते. मनोज कुमार यांना ७ फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. पहिला फिल्मफेअर पुरस्कार १९६८ मध्ये 'उपकार' चित्रपटासाठी मिळाला. 'उपकार' ला सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट कथा आणि सर्वोत्कृष्ट संवाद असे चार फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. १९९२ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०१६ मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मनोज कुमार यांचे पार्थिवार शनिवारी सकाळी ११ वाजता मुंबईतील पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार उद्या होईल. मनोज कुमार बऱ्याच काळापासून लिव्हर सिरोसिसने ग्रस्त होते. त्यांची प्रकृती बिघडल्यानंतर २१ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. अखेर आज त्यांची प्राणज्योत मावळली.

त्यांच्या निधनावर राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक नेते तसेच चित्रपट सृष्टीतील कलाकारांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

# महासागर कर्मयोगी पुरस्काराचे आज वितरण



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ४ :**
गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर मुहूर्तमेढ झालेला दैनिक महासागरने ५५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्या प्रित्यर्थ शनिवार ५ एप्रिल रोजी 'महासागर कर्मयोगी पुरस्कार' वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
सायंकाळी ५ वाजता माहेश्वरी भवन, टेकडी मार्ग, सीताबर्डी, नागपूर येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त न्यायमूर्ती विजय डागा असतील. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नागपूर शहराचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, उद्योगपती प्रकाश वाघमारे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

रूग्णांची अविरत सेवा करणारे पद्मश्री डॉ. विलास डांगरे, जेष्ठ पत्रतपस्वी कमलाकर धारप, तळागाळातील व्यक्तींच्या विकासासाठी झटणारे डॉ. हरीश धुरट यांना कर्मयोगी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून, सामाजिक क्षेत्रासाठीचा पुरस्कार सेवाभावी संस्था म्हणून प्रगती राजस्थानी महिला मंडळ यांना प्रदान करण्यात येणार आहे. प्रत्येकी २५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

शनिवार ५ एप्रिल रोजी कार्यक्रमास सर्व समाज बांधवांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, सीईओ उमाशंकर लाल, निवड समिती सदस्य प्रभाकर दुपारे, राहुल चांडक, पंकज चांडक, विशाल चांडक, प्रवीण डबली, कमल नामपल्लीवार व समस्त महासागर वृत्तपत्र समूह परिवारातर्फे करण्यात आले आहे.

# भरचौकात गोळी झाडून तरुणाची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ४ :**
नागपूरमध्ये भरचौकात गोळीबार आणि चॉपरने हल्ला करत तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. किरकोळ वादातून ही हत्या झाल्याचे पुढे आले असून या प्रकरणी पोलिसांकडून चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
गोधनी प्रकाश नगर परिसरात झालेल्या या हत्येप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सोहेल खान असे मृतकाचे नाव आहे.
नागपूर शहरातील गोधनी प्रकाश नगर परिसरात गोविंद लॉनजवळ गुरुवारी रात्री ४ आरोपी गाडीने आले. तेथील तरुणांना शाहरूख कुठे आहे असे विचारत आरोपींनी शिवीगाळ सुरू केली. एकाने देशी पिस्तूल काढत गोळीबारच सुरू केला. त्यातील एक गोळी लागून सोहेल खान (३५) नावाचा तरुण जखमी झाला. तर भाजी विकत घेण्यासाठी आलेल्या मो. सुलतान उर्फ मो.शफी याच्या मानेला चाटून गोळी गेली व तोदेखील जखमी झाला. मानकापूर पोलिस तातडीने घटनास्थळी पोहोचले व सोहेलला मेयो इस्पितळात नेले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.
या हत्येप्रकरणी पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत धीरज घोडमारे, राजेंद्र मरकाम, आणि भूषण या तिघांना अटक केली आहे. तर चौथा आरोपी चंदू डोंगरे फरार आहे.

# कडक कारवाई करू...

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४ :**



पुण्याच्या दीदानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. दीनानाथ रुग्णालयाने महिलेला अ‍ॅडमिट करून घेणे गरजेचे होते. भविष्यात अशा घटना पुन्हा होवू नये यासाठी कडक कारवाई करू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.
धर्मदाय रुग्णालयांनी आपली भूमिका योग्य प्रकारे निभावली पाहिजे. धमार्दाय रुग्णालयांकडून नैतिकतेचे पालन होते की नाही, यासंदर्भात आपण प्रयत्न करणार आहोत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले.




श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव जि. बुलढाणा
(पब्लिक ट्रस्ट रजि. नं. ए-२५० बुल.)
१३१ वा श्रीरामनवमी उत्सव
दरवर्षी प्रमाणे यावर्षी १३१ वा श्रीरामजन्मोत्सव दि. ३०/०३/२०२५ ते दि. ०६/०४/२०२५ पावेतो परंपरेनुसार कार्यक्रम होऊन संपन्न होईल. आपण सर्वांनी उत्सवात सर्वतोपरी सहभागी व्हावे, ही विनंती.
श्री मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होईल हे लक्षात घेता व काही अप्रिय घटना घडू नये याची दक्षता म्हणून वन-वे (एकेरी मार्ग) करण्यात आला आहे. त्यात श्रींची समाधि दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, श्री महाप्रसाद, श्री पारायण कक्ष मंडप इत्यादी व्यवस्था केलेली आहे.
शेगांवी आलेवर निवास व्यवस्थेकरीता भक्तनिवास संकुल, विहार भक्तनिवास संकुल, विसावा भक्तनिवास संकुल येथे चौकशी करावी.
भक्तांनी भक्तनिवासामध्ये निवास व्यवस्था घेतेवेळी श्री संस्थानच्या नियमाप्रमाणे कोणतेही शासकीय एक / दोन ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील.
व्यवस्थापकीय विश्वस्त,

# शरद पवारांनी पुन्हा केले कन्फ्युज



**मुंबई :** संसदेच्या वरिष्ठ सभागृहाने म्हणजे राज्यसभेने गुरुवारी मध्यरात्री उशिरा वक्फ दुरुस्ती विधेयकावर आपली मोहोर उमटवली. या विधेयकावरील मतदानावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार अनुपस्थित राहिले. त्यामुळे शरद पवार या विधेयकावरून नरेंद्र मोदी सरकारच्या बाजूने उभे आहेत की विरोधात? याविषयी राजकीय वर्तुळात खमंग सुरू झाली आहे.

लोकसभेने वक्फ दुरुस्ती विधेयकावर बुधवारी मध्यरात्री २ च्या ठोक्याला आपली मोहोर उमटवली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी हे विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडण्यात आले. या सभागृहाने गुरुवारी मध्यरात्री २ च्या सुमारास हे विधेयक हातावेगळे केले. आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल. त्यांची त्यांच्यावर स्वाक्षरी झाली की या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. पण आता या विधेयकाला शरद पवारांचा पाठिंबा आहे विरोध? असा प्रश्न चर्चेत आला आहे. शरद पवार या विधेयकावरील मतदानावेळी सभागृहात गैरहजर असल्यामुळे हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**राष्ट्रवादीचे दोन खासदार मतदानाला गैरहजर**

यासंबंधीच्या माहितीनुसार, वक्फ दुरुस्ती विधेयकावरील लोकसभेतील मतदानावेळी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे व सुरेश बाळ्या मामा म्हात्रे गैरहजर राहिले. विशेष म्हणजे सुरेश म्हात्रे हे वक्फ विधेयकावर स्थापन करण्यात आलेल्या संसदेच्या संयुक्त समितीचे (जेपीसी) सदस्य होते. पण त्यांनी कोणत्याही बैठकीत सहभाग घेतला नाही. शरद पवारांच्या निकटवर्तीयांनी एबीपी न्यूजशी बोलताना शरद पवारांवर मुंबईत उपचार सुरू आहेत. त्यामुळे ते दिल्लीला आले नाहीत. पण शरद पवार गटाच्या खासदारांनीही या विधेयकावरील मतदानाला दांडी मारल्यामुळे शरद पवार गटाच्या या विधेयकावरील भूमिकेविषयी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

**सुप्रिया सुळेंनी केले होते अमित शहांचे कौतुक**

उल्लेखनीय बाब म्हणजे शरद पवारांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे तोंडभरून कौतुक केले होते. आम्हाला गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून जास्त अपेक्षा आहेत. कारण, ते एक खंबीर गृहमंत्री आहेत. त्यांनी काश्मीरमध्ये सुपीरियर रिझल्ट्स दिले. पण मणिपूरच्या मुद्यावर आमचे समाधान झाले नाही. सरकार एक देश एक निवडणुकीवर चर्चा करत आहे. पण राष्ट्रपती राजवट लावण्याची वेळ येणे हे सशक्त लोकशाहीसाठी चांगली गोष्ट नाही. शहा प्रयत्न करून मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करतील असा आम्हाला विश्वास आहे, असे त्या म्हणाल्या होत्या.

# शहाजी बापू पाटलांच्या कृतीने वेधले सर्वांचे लक्ष



**सोलापूर :** शिवसेना शिंदे गटाचे नेते व माजी आमदार शहाजी बापू पाटील हे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. शहाजी बापू पाटील यांनी एका कार्यक्रमात बोलत असताना भरसभेत स्वतःच्याच तोंडात मारून घेतल्याचे पाहायला मिळाले आहे. यामुळे ते पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. शहाजी बापू पाटील हे त्यांच्या विधानांमुळे नेहमीच चर्चेत असतात. आता त्यांच्या कृतीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. माजी आमदार शहाजी बापू पाटील हे सांगोल्यातील पाण्याच्या मुद्द्यावर बोलत असताना भर सभेत स्वतःच्याच तोंडात मारून घेतले. त्यांच्या या कृतीने उपस्थितांमध्ये एकच हशा पिकल्याचे पाहायला मिळाले. त्यांचा हा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होताना दिसत आहे. शहाजी बापू पाटील भाषण करत असताना व्यासपीठावर सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह काही नेते देखील उपस्थित होते. शहाजी बापू पाटील सांगोला येथील पाण्याच्या मुद्द्यावर बोलत होते. ते बोलत असताना त्यांनी स्वतःच्या तोंडात मारून घेतले. शहाजी बापू म्हणाले, ज्यांनी पाणी आडवण्याचे काम केले, त्यांना तुम्ही खासदार म्हणून संसदेत पाठवले. पण ज्यांनी तुम्हाला पाणी दिले, त्यांना तुम्ही घरी बसवले. त्यामुळे आपल्याला देखील काहीतरी वाटायला पाहिजे. आपल्या या चुकीमुळे आपण तोंडात मारून घेतले पाहिजे, असे म्हणत शहाजी बापू पाटील यांनी भरसभेतच स्वतःच्या तोंडात मारून घेतले. त्यांच्या या कृतीने सर्वांचेच लक्ष वेधले आणि एकच हशा पिकला.

# परिवहन विभागाच्या जमिनीवरील अतिक्रमण हटवण्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

**मुंबई :** राज्यभरात परिवहन विभागाच्या मालकीच्या जमिनींवर झालेले अतिक्रमण तातडीने हटवून त्या जागा अतिक्रमणमुक्त कराव्यात, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. ते आज परिवहन आयुक्त कार्यालयात आयोजित विभागीय आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह विभागातील सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यभरातील अनेक ठिकाणी परिवहन विभागाच्या मालकीची जमीन असून, त्या जमिनींवर अनेक वर्षांपासून अनधिकृत अतिक्रमण झालेले आहे. या जमिनींवर स्थानिक अधिकाऱ्यांनी तातडीने सर्वेक्षण करून कारवाई करावी. अतिक्रमण हटवून त्या जमिनींवर कुंपण भिंत उभारावी व विभागाच्या नावाचा फलक लावावा, तसेच भविष्यात पुन्हा अतिक्रमण होणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

# १२ला अमित शहा, सीएम रायगडावर



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ४ :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १२ एप्रिलला रायगडावर येणार आहेत. शिवाजी महाराज यांचा अवमान करणाऱ्याचा विरोधात कायद्याची घोषणा जर रायगडावरुन झाली तर तिला वेगळे महत्त्व येईल असे वक्तव्य खासदार उदयनराजे भोसले यांनी केले आहे. खासदार उदयनराजे पुढे बोलताना म्हणाले की, १२ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीप्रमाणे पुण्यतिथी आहे. त्या दिवशी ही घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. शिवरायांच्या पुण्यतिथीला अमित शहा रायगडावरती भेट देणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

खासदार उदयनराजे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्यांच्या विरोधात मी जी इच्छा व्यक्त केली होती, त्या कायद्याची घोषणा झाली तर याला वेगळे महत्व प्राप्त होईल, असेही त्यांनी म्हटले आहे. आता या कायद्याची १२ तारखेला घोषणा होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उदयनराजे यांनी काही दिवसांपूर्वी म्हटले होते की, महापुरुषांच्या अवमानाची चौकशी डीवायएसपी दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून झाली पाहिजे. तर अशा प्रकरणातील आरोपपत्र किमान ३० दिवसांत दाखल झाले पाहिजे आणि या गुन्ह्याचा निकाल सहा महिन्यांत लागला पाहिजे, असा कायदा केला पाहिजे, असे उदयनराजेंनी म्हटले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्याबाबत बोलण्याचे कोणी धाडस करता कामा नये. याबाबत अजामीनपात्र गुन्ह्याचा कायदा मंजूर करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये कमीत कमी १० वर्षांची शिक्षा आणि जास्तित जास्त रुपयांचा दंड झाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी बेताल वक्तव्य करणाऱ्यांच्या विरोधात विशेष कायदा मंजूर करण्यात आला पाहिजे, अशी मागणी भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी केली आहे.

# अजित पवार सत्तेसाठी लाचार झालेत

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ४ :** भारतीय जनता पक्षाला पाठिंबा देत सरकारमध्ये सहभागी झालो तरी शिव, शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचाराचा वारसा सोडला नाही असे सांगणाऱ्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा खरा चेहरा उघडा पडला आहे. भाजपा सरकारने आणलेल्या वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देऊन अजित पवार यांनी सत्तेसाठी भाजपापुढे लोटांगणच घातले असल्याचा घणाघाती हल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



लोकसभेने वक्फ दुरुस्ती विधेयकावर बुधवारी मध्यरात्री २ च्या ठोक्याला आपली मोहोर उमटवली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी हे विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडण्यात आले. या सभागृहाने गुरुवारी मध्यरात्री २ च्या सुमारास हे विधेयक हातावेगळे केले. आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल. त्यांची त्यांच्यावर स्वाक्षरी झाली की या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. या विधेयकाला अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा दिला आहे. यावरून हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अजित पवार यांनी काका शरद पवार यांचा पक्ष भाजपाच्या मदतीने चोरून पक्षाचे नाव व चिन्हही घेतले व सत्तेसाठी धर्मांध शक्तीच्या बाजूला जावून बसले. तेव्हापासून ते सातत्याने आपण विकासासाठी सत्तेत सहभागी झालो असलो तरी, पुरोगामी विचार सोडला नाही असे बिंबवण्याचा प्रयत्न ते करत आहेत.

त्यांनी एका इफ्तार पार्टीत सहभागी होत मुस्लिम समाजाला त्रास देणाऱ्यांना सोडणार नाही, माफ केले जाणार नाही, अशा वल्गना केल्या. मुस्लिम समाजाच्या पाठीमागे आहे असे सांगून चार दिवस होत नाहीत, तोच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देऊन मुस्लिम समाजाचा विश्वासघात केला.

**अजित पवार सत्तेसाठी लाचार**

वक्फ विधेयक हा केवळ मुस्लिम समाजाला घाबरवून वक्फ बोर्डाची लाखो एकर जमीन ताब्यात घेण्याचा भाजपा सरकारचा डाव आहे. मुंबईत धारावीसह अनेक महत्वाच्या जमिनी एका विशेष उद्योगपतीला देण्याचा सपाटा भाजपा सरकारने लावला आहे.

उद्या वक्फच्या जमिनी ताब्यात घेऊन त्या जमिनी हे सरकार लाडक्या उद्योगपतींच्या घशातच घालणार आहे हे अजित पवार यांच्यासारख्या नेत्याला माहित नाही असे नाही. पण सत्तेशिवाय राहू न शकणाऱ्या अजित पवारांनी खुर्चीसाठी भाजपासमोर लाचार होऊन विधेयकाला पाठिंबा दिला आहे.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर राजकीय पडसाद

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. ४ :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गुरुवारी घडलेल्या घटनेवर आता राजकीय पडसाद उमटण्यास सुरुवात झाली असल्याचे दिसत आहे. पैशांअभावी गर्भवती महिलेवर उपचार करण्यास नकार दिल्याने महिलेचा जीव गेल्याची घटना घडली होती. यानंतर आरोग्यमंत्र्यांनी रुग्णालयावर कारवाईचे आदेश दिले असून पोलिस आज रुग्णालय प्रशासनाची चौकशी करणार आहे. यावर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली असून ही अतिशय मोठी चूक आहे आणि अशा चुकीला माफी नसते, असे म्हटले आहे.

पत्रकारांशी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आंदोलन करणे हा आपला अधिकार आहे.



पण जी चूक झाली आहे ती फार मोठी चूक आहे आणि अशा चुकीला माफी नसते. सरकार यावर योग्य कारवाई करेल कारण कोणाचाही परिवार असो पीएचा आहे किंवा माझा परिवार आहे, असे नाही. सर्वसाधारण गरीब माणसाला अशी सेवा न देणे आणि मुजोरगिरी करणे ही एक प्रकारची मुघलशाही आहे. कोणाची काय चूक आहे ते तपासले पाहिजे. ही गंभीर घटना असून याची दखल स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. आम्ही सर्वांनी याची गंभीर दखल घेतली आहे आणि कोणालाही आम्ही सोडणार नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. रुग्णाच्या कुटुंबीयांना १० लाख रुपये मागण्यात आले होते, यावर प्रतिक्रिया देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आम्ही कोणालाही सोडणार नाही. अजित पवार आहेत, आम्ही आहोत आणि जे काही झाले आहे यावर आम्ही कठोर कारवाई करणार आहोत. या घटनेमुळे जनतेमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. अशा बाबी आम्ही माफ करणार नाही. मी जिल्हाधिकाऱ्यांना बोललो आहे. या रुग्णालायला आम्ही खूप काही दिले आहे. सरकार म्हणून आम्ही रुग्णालयाच्या पाठीशी उभे आहोत. पण रुग्णालयातील प्रशासन कर्मचारी मुघलशाही करत असतील तर आम्ही त्यांना सोडणार नाही, अशी ग्वाही चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

या घटनेवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी देखील संतप्त टीका केली आहे. रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची टीका संजय राऊत यांनी केली आहे. संजय राऊत पत्रकारांशी बोलताना म्हणाले, हिंमत असेल तर रुग्णालयावर कारवाई करावी. भिसे कुटुंब ज्या ज्या डॉक्टरांचे नावे घेत आहेत त्यांच्यावर कारवाई करावी. हिंमत असेल तर. तुमची हिंमत फक्त विरोधकांच्या कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकण्यापूर्तीच आहे. तुमच्यात काय दम आहे. ज्या दिवशी सत्ता तुमच्याकडे नसेल, तेव्हा रस्त्यावर कावळा सुद्धा तुमच्याकडे बघणार नाही आणि काव काव करणार नाही. त्यांनी रुग्णालयावर कारवाई करून दाखवावी, माझे आव्हान आहे त्यांना.

# अर्जुन खोतकर यांनी हात लावला तिथे माती केली



**जालना :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया या बुधवारी जालन्याच्या दौऱ्यावर होत्या. यावेळी त्यांनी जालन्यातील साखर रामनगर सहकारी साखर कारखाना सभासद कामगार शेतकऱ्यांशी संवाद साधला. यानंतर अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेत शिवसेना शिंदे गटाचे नेते अर्जुन खोतकर यांच्यावर हल्लाबोल केला आहे. आताचे राजकारणी बोट लावतील तिथे माती करतात, असे म्हणत अंजली दमानिया यांनी अर्जुन खोतकर यांच्यावर निशाणा साधला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या, एक काळ होता सर्व राजकारणी बहुतांश राजकारणी सिद्धांतवादी होते, आताचे बहुतांश राजकारणी बोट लावतील तिथे माती करतात. त्यातीलच एक अर्जुनराव खोतकर, त्यांनी जिथे जिथे हात लावला तिथे त्यांनी माती केली. सहकारी साखर कारखाना, जालन्याची कृषी उत्पन्न बाजार समिती असो खरेदी विक्री केंद्र असो या प्रत्येक ठिकाणी जिथे जिथे त्यांनी हात लावला तिथे तिथे त्यांनी माती केली. अंजली दमानिया पुढे म्हणाल्या, अर्जुन खोतकर यांच्या विरुद्ध मोठा लढा उभारण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांसाठी, कामगारांसाठी लढा उभारण्याची गरज आहे. कामगारांची देणी आतापर्यंत २०१२ पर्यंत १०८ कोटी होती ती मिळाली नाहीत. प्रॉविडंट फंड मिळालेले नाहीत. कारखाना विकत घेताना कामगारांचे शेतकऱ्यांचे देणे द्यावे लागते मात्र तसे न करता कारखाना त्यांना कवडी मोलात मिळालेला आहे.

# सेवानिवृत्त अधिकारी प्रभाकर देशमुख यांच्या निवासस्थानी चौकशी



■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. ४ :** ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना खंडणी मागितल्याच्या प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे. सेवानिवृत्त आयएएस अधिकारी व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्रभाकर देशमुख यांच्या पुणे येथील कोरेगाव पार्क मधील निवासस्थानी सातारा पोलीसांनी त्यांची चौकशी केली अशी चर्चा आहे. मात्र देशमुख यांनी याबाबत कोणतेही भाष्य केले नाही. गेल्या काही दिवसापूर्वी दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याच्या प्रकरणात एका महिलेला सातारा पोलिसांनी रंगेहाथ पकडले होते. या महिलेला पोलिसांनी रक्कम स्वीकारताना पकडून अटक केली. मंत्री जयकुमार गोरे यांच्यावरील महिलेच्या विनयभंग प्रकरणात गुन्हा दाखल असून ते प्रकरण सुरू असतानाच त्याच महिलेकडून खंडणी मागितल्याचा गुन्हा सातारा पोलिसात दाखल झाला आहे त्यादरम्यान प्रभाकर देशमुख पत्रकार तुषार खरात यांचे फोन संबंधित महिलेला गेल्याची चौकशीत आढळून आले आहे यामुळे यात प्रभाकर देशमुख यांचा कितपत हात आहे याची चौकशी करण्यासाठी म्हणून सातारा पोलिसांनी पुण्यातील कोरेगाव पार्क भागातील देशमुख यांच्या घरी त्यांची तीन तासापेक्षा जास्त चौकशी केली.

# शातिर THE BEGINNING चित्रपट ९ मे रोजी होणार प्रदर्शित

लोकरंजन



सध्या चर्चेत असलेल्या सस्पेन्स थ्रिलर मराठी चित्रपट शातिर ळ्ऌए इएत्रऋ्त्ठठक्ठत्रऋचे दमदार गीत गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. महाराष्ट्राचे तीर्थस्थान असलेल्या किल्ले रायगडावर तब्बल २०० कलाकारांच्या सहभागाने या भव्य गीताचे चित्रीकरण करण्यात आले आहे. सावित्रीच्या लेकी आम्ही, शिवबाच्या तलवारी, पोरी आम्ही मराठी पोरी... असे बोल असलेल्या या दमदार मराठमोळ्या गाण्याला समाज माध्यमांमधून प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या गीतामधून मराठी महिलांच्या कर्तृत्वाची गाथा आणि त्यापासून मराठी पोरींना मिळणारी प्रेरणा दर्शविण्यात आली आहे.

वैभव देशमुख या चित्रपटाचे गीतकार असून रोहित नागभिडे यांचे संगीत आहे. विख्यात गायिका वैशाली सामंत यांनी या गाण्यांना स्वरसाज चढविला आहे. शातिर ळ्ऌए इएत्रऋ्त्ठठक्ठत्रऋ या चित्रपटाची निर्मिती श्रीयांश आर्ट्स अँड मोशन पिक्चर्स या बॅनरखाली रेश्मा वायकर यांनी केली असून या चित्रपटाद्वारे सुनील सुशीला दशरथ वायकर यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले आहे.

या चित्रपटात रेश्मा वायकर या प्रमुख भूमिकेत असून त्यांच्यासह मीर सरवर, योगेश सोमण, रमेश परदेशी, अनिल नगरकर, अभिमन्यू वायकर, वेद भालशंकर, श्रेया कुलकर्णी, गौरव रोकडे, निशांत सिंग, मनोज चौधरी हे महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. येत्या ९ मे २०२५ रोजी शातिर THE BEGINNING हा मराठी चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. ■ ■

## जिओ स्टुडिओ प्रस्तुत झापुक झुपूक चित्रपटाची उत्सुकता शिगेला !

जिओ स्टुडिओ प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती सौ. बेला केदार शिंदे ,केदार शिंदे दिग्दर्शित झापुक झुपूक या सिनेमाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. दमदार टिझर आणि पोस्टर नंतर आता आणखी एक नवा धमाकेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आलाय. फॅमिली एंटरटेनमेंटचा जबरदस्त तडका असलेल्या झापुक झुपूक या




चित्रपटाच्या ह्या नव्या पोस्टरमध्ये मराठी मालिकाविश्वातील लोकप्रिय चेहरे पहायला मिळत आहेत. केंदार शिंदे दिग्दर्शित झापुक झुपूक चित्रपटात सूरज चव्हाणसह लोकप्रिय इतर कलाकार कल्ला करताना दिसणार आहेत. यामध्ये पिरतीचा वनवा उरली पेटला मालिकेतील इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, अबीर गुलाल मालिकेतील पायल जाधव, तुमची मुलगी काय करते मालिकेतील जुई भागवत आणि दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत.

पोस्टरमध्ये आपण पाहू शकतो सूरज बैलगाडी ओढत आहे तर त्याच बैलगाडीवर बाकी सर्व कलाकार स्वार आहेत. सर्व कलाकारांच्या चेहऱ्यावर हसू आहे ज्यामुळे नक्की चित्रपटाची कहाणी काय असणार आहे याची सर्वांना उत्सुकता आहे. आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारे उत्तम युवा अभिनेत्यांमुळे हा चित्रपट नक्कीच सध्याची युवा पिढी आणि सिनेप्रेमींच्या पसंतीस उतरणार आहे. झापुक झुपूक सिनेमा चित्रपटगृहात, २५ एप्रिल पासून प्रदर्शित होणार आहे !! ■ ■

## रहस्यमय 'जारण' चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित !




ए अँड एन सिनेमाज एलएलपी आणि ए३ इव्हेंट्स अँड मिडिया सर्व्हिस प्रॉडक्शन प्रस्तुत जारण चित्रपट येत्या ६ जून २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे रहस्यमय मोशन पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित झाले आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन हृषीकेश गुप्ते यांनी केले असून अमोल भगत आणि नितीन भालचंद्र कुलकर्णी यांनी निर्मितीची धुरा सांभाळली आहे. या चित्रपटात कोणते कलाकार झळकणार, हे सुद्धा सध्या तरी एक रहस्यच आहे.

मोशन पोस्टरमध्ये एका विवाहितेच्या हातात बाहुली दिसत असून तिला टाचण्या टोचलेल्या आहेत. सोबतच पार्श्वभूमीला ऐकू येणाऱ्या रोमांचक संगीतामुळे हे मोशन पोस्टर थरारक अनुभवही देत आहे. यावरून हा चित्रपट जादूटोण्यावर आधारित तर नसेल? असा प्रश्न जर प्रेक्षकांना पडला, तर हे जाणून घेण्यासाठी थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

दिग्दर्शक हृषीकेश गुप्ते म्हणतात, 'हा एक कौटुंबिक भयपट आहे. करणी, जारण यासारख्या गोष्टींमुळे एका कुटुंबाला सहन करायला लागणाऱ्या यातना हा चित्रपट मांडतो. मानवी भावनांचा आणि दुहेरी आयुष्याचा शोध घेणारा प्रवास आहे. प्रेक्षकांना एक वेगळा भयगूढ अनुभव देण्याचा प्रयत्न आम्ही जारणमधून केला आहे. आम्हाला खात्री आहे की, आमचा हा चित्रपट रसिकांना नक्की आवडेल. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# मालेगावच्या मोसम नदीत शेकडो टन प्लास्टिक कचऱ्याचा खच



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मालेगाव, दि. ४ :** गेल्या वर्षांपेक्षा अधिक काळ राज्यात स्वच्छता अभियान राबविले जात असले तरी मालेगावच्या मोसम नदीवर याची कृपा झाली नाही. पावसाळा संपताच नदीची गटारगंगा झाली. गेल्या महिनाभरात शेकडो क्विंटल प्लास्टिक कचरा पात्रात पडला आहे. कचरा संकलनावर महापालिका कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. मग हा कचरा घंटागाड्यांमध्ये न जाता नदीपात्रात कसा पोहोचतो हा संशोधनाचा विषय ठरला आहे. बागलाण तालुक्यात उगम पावणारी मोसम नदी मालेगाव शहरातून साडेसात किलोमीटरचा प्रवास करते. नदीचे सर्वाधिक प्रदूषण मालेगाव शहरात आहे. आठ महिने मोठ्या प्रमाणात नदीपात्रात कचरा असतो. सामाजिक कार्यकर्ते अथवा पर्यावरणप्रेमींनी आवाज उठविल्यानंतर महापालिकेकडून नदी स्वच्छ केली जाते. यानंतर हे अभियान बासनात गुंडाळले जाते. चांगला पाऊस झाला तर निसर्गच या नदीची स्वच्छता करतो. यावर्षी देखील नदी स्वच्छ झाली. तब्बल तीन महिने पाण्याचा प्रवाह टिकून होता. मात्र, गेल्या महिनाभरापासून नदीपात्रात पुन्हा कचरा टाकला जात आहे. रामसेतूपासून पुढे अल्लामा इक्बाल पुलापर्यंत महादेव घाटाजवळ नदीच्या दुतर्फा किनाऱ्यालगत शेकडो टन कचरा फेकला गेला आहे. यामुळे नदीपात्रातील गटारीच्या पाण्यात तरंगणारा प्लास्टिकचा थरच तयार झाला आहे. पात्रात प्लास्टिकखाली गटारींचे पाणी व वरून उन्हाचा चटका यामुळे निर्माण होणारे रासायनिक प्रदूषण नागरी आरोग्यासाठी मोठ्या प्रमाणात घातक ठरणारे आहे.

# दिशाच्या लॅपटॉप मध्ये सापडला सतीश सालियन यांचा व्हॉट्सअप डाटा

**मुंबई, दि. ४ :** दिशा सालियन मृत्यू प्रकरणात आता मोठी माहिती समोर आली आहे. दिशाच्या लॅपटॉप मध्ये तिचे वडील सतीश सालियन यांचा व्हॉट्सअप डाटा मिळाल्याची माहिती समोर आली आहे. या आधीच एसआयटी चौकशी दरम्यान हा डाटा मिळाला होता. दिशाचे वडील सतीश सालियन यांचे एका महिलेची संबंध असल्याचा दिशाला संशय होता. ती आपले व्हॉट्सअप बघते, याची तिच्या वडिलांना माहिती नव्हती. त्या महिलेला दिशाच्या वडिलांनी तीन हजार रुपये दिले होते. याबाबत दिशाने वडीलांना जाब विचारला होता. २ जून २०२० रोजी त्यांच्यात हा संवाद झाला होता. त्यानंतर ४ जूनला दिशाने घर सोडले होते. वडिलांचे घर सोडून दिशा मालाडला गेल्याचे तिच्या मित्रांनी सांगितले होते. दिशाच्या मित्रांनी देखील पोलिस चौकशीत या माहितीला दुजोरा दिला आहे. दिशा सालियन प्रकरणात रजिस्टारच्या चुकीमुळे अधिकार नसलेल्या पीठासमोर हे प्रकरण सुनावणीसाठी लागले होते. वास्तविक हे प्रकरण सारंग कोतवाल यांच्या पीठासमोर लागायला पाहिजे होते. मात्र, आता न्याय पिठाने हे प्रकरण कोतवाल यांच्या पीठासमोर पाठवण्याचे आदेश दिले असल्याची माहिती डॉ. नीलेश ओझा यांनी दिली आहे..

# स्वारगेट बलात्कारातील आरोपीची पोलिस कोठडी मागणी फेटाळली



**पुणे, दि. ४ :** स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये वर्षीय तरुणीवर बलात्कार केल्याचा प्रकार फेब्रुवारी रोजी घडला होता. या प्रकरणात आरोपी दत्तात्रय गाडे (, रा. गुनाट, शिरूर, पुणे) यास पोलिसांनी अटक केली. सुरुवातीलाच गाडे यास एकूण दिवसांपैकी दिवस पोलिस कोठडी मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याचा उर्वरित कोठडीचा अधिकार राखून ठेवत त्यास न्यायालयीन कोठडी मिळावी, असे न्यायालयात सांगितले होते. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांना आरोपीबाबत आणखी नवीन माहिती मिळाली असून त्याकरिता त्याला किमान दिवसाची कोठडी मिळावी, अशी मागणी गुरुवारी न्यायालयात केली, परंतु प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी टी. एस. गायगोले यांनी आरोपीचा दुसऱ्यांदा पोलिस कोठडी मिळण्याचा अर्ज फेटाळून लावला आहे. पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी याप्रकरणात आरोपीला अटक केल्यानंतर दिवसात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येईल, असे जाहीर केले होते. परंतु अद्याप याबाबत दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही.

# मुक्या २५ कुत्र्यांना विष देत मारले



**अकोला:** अकोल्याच्या गुडी परिसरात घडलेली ही घटना आहे. केवळ एक बातमी म्हणून वाचून पुढे जाणं कठीण आहे. एका माथेफिरूने मुक्या जनावरांना विषारी अन्न दिलं आणि बघता बघता २५ हून अधिक कुर्त्यांनी तडफडून जीव सोडला. रस्त्यावर भुंकणाऱ्या, शेपटी हलवत येणाऱ्या निष्पाप जीवांसाठी हे कृत्य कूरतेचा कळसच होता. पाळीव आणि मोकाट, सगळेच कुत्रे त्या विषारी अन्नाचे बळी ठरले. हे सगळं वाचताना, ऐकताना मन सुन्न होतं. मुक्या प्राण्यांनाही वेदना होतात, त्यांनाही जगण्याचा हक्क आहे, हे आपण विसरतो का ? कुत्रे भुंकतात, म्हणून त्यांना मारण्याचा विचार एखाद्याच्या डोक्यात यावा, हे किती भयानक आहे. स्थानिक नागरिकांनी सीसीटीव्ही फटेज पोलिसांना दिलंय, आता पोलीस काय कारवाई करतात, याकडे सगळ्यांचं लक्ष लागलंय. पण फक्त कारवाई करून थांबून चालणार नाही. या घटनेने आपल्या समाजातील कूरतेचा चेहरा उघड केला आहे. संदीप गावंडे यांच्यासारखे अनेक संवेदनशील नागरिक या घटनेने हादरले आहेत.या मुक्या जिवांना न्याय मिळायला हवा, मारेकऱ्याला कठोर शिक्षा व्हायला हवी. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, आपली प्राण्यांबद्दलची संवेदनशीलता जागृत व्हायला हवी. कारण आज कुत्रे मारले गेले, उद्या आणखी कोणीतरी या कूरतेचा बळी ठरूशकतो.

# जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची होणार रासायनिक-जैविक तपासणी

## ➲वेळेत तपासणी करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांचे आवाहन



**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी):**

**४ एप्रिल २०२५ - नागरिकांना शुध्द स्वच्छ गुणवत्तापूर्ण पाणी उपलब्ध करून देण्यासाठी करून जिल्ह्यात दि. १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक-जैविक तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये नळ योजनांचे स्त्रोत, शाळा, अंगणवाडी मधील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचा समावेश आहे. या अभियानात ग्राम पंचायतस्तरीय यंत्रणांनी सहभागी होऊन स्त्रोतांची रासायनिक-जैविक पाणी तपासणी वेळेत पूर्ण करावी असे आवाहन अकोला जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांनी केले आहे.**

पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत दरवर्षी गावस्तरावरील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक व जैविक तपासणी करून नागरिकांना शुध्द स्वच्छ व गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जाते. ग्राम पंचायतस्तरावरील जलसुरक्षकांमार्फत उपविभागीय प्रयोग शाळा अकोला, मुर्तिजापुर, बार्शिटाकळी, तेल्हारा येथे पाणी नमुने गोळा करून तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

यामध्ये जैविक च्या २ मानकांची व रासायनिक च्या १० मानकांची तपासणी प्रयोगशाळेत प्राप्त होणा-या पाण्याची या कालावधीमध्ये होणार आहे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद अकोला अंतर्गत पाणी गुणवत्ता शाखेच्या वतीने दिनांक १ एप्रील ते ३० जून २०२५ या कालावधीत मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांचे मार्गदर्शनात, प्रकल्प संचालक (जजीमि) अनिता तेलंग यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांचे रासायनिक तपासणी पूर्ण करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे. एपिल ते जून या तीन महिण्याच्या कालावधीत रासायनिक पाणी तपासणीकरीता गावस्तरावरून जल सुरक्षकांमार्फत पाणी नमुने गोळा करून उपविभागीय प्रयोगशाळांमध्ये पाठविण्यास गटविकास अधिकारी, पंचायत समिती सर्व यांना निर्देश देण्यात आले आहे. गटविकास अधिकारी यांचे अधिनस्थ असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्याच्या माध्यमातून रासायनिक पाणी नमुने तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहे. तपासणी करण्यात येणाऱ्या स्त्रोतांतध्ये नळ पाणी पुरवठा योजनेचा स्त्रोत, त्यानंतर पहिला, मधला व शेवटचा नळ तसेच शाळा, अंगणवाडी येथील स्त्रोताचे पाणी नमुने प्रयोगशाळांना गोळा करायचे आहेत. केंद्र शासनाचे पाणी गुणवत्ता संकेतस्थळावर स्त्रोतांच्या पाणी नमुना घेवून जातांना व तपासणी नंतर च्या नोंदी घेतल्या जाणार आहेत.

पाणी गुणवत्ता तपासणीमध्ये दूषित आढळून आलेल्या स्त्रोतांवर प्रतिबंधात्मक उपाय योजना करून त्याच्यांही नोंद या संकेतस्थळावर घेतल्या जाणार आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने दिनांक १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक व जैविक तपासणी महत्वाची आहे. शासकिय यंत्रणांनी सहभागी होऊन पिण्याच्या पाण्याची स्त्रोतांची रासायनिक व जैविक तपासणी वेळेत पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन अकोला जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांनी केले आहे.

# हमीदराने हरभरा खरेदीसाठी २२ केंद्रांवर नोंदणी सुरू

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी):**

नाफेडतर्फे आधारभूत किंमत योजनेत हमीदराने हरभरा खरेदीसाठी अकोला व वाशिम जिल्ह्यात २२ केंद्रांवर नोंदणी सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती अकोला व वाशिम जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी दिली.हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत योजनेत हरभरा खरेदीसाठी दि.२५ एप्रिलपर्यंत नोंदणी सुरूराहील. शेतक-यांनी आधारपत्र, सातबारा, ऑनलाईन पीकपेरा, आधार जोडणी असलेल्या बँक खातेपुस्तिकेची छायाप्रत, भ्रमणध्वनी क्रमांक आदी कागदपत्रांसह संबंधित खरेदी केंद्रावर जाऊन हरभरा खरेदीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तालुका शेतकी सहकारी खरेदी विक्री समि



त्यांची बाळापूर, वाडेगाव, बार्शिटाकळी, पातूर, मालेगाव आदी कार्यालये, आलेगाव येथे शत्रूंजय शेतकरी उत्पादक कंपनी, कवठा येथे ॲग्रीस्टॉक शेतकरी उत्पादक कंपनी, बेलखेड येथील शेतकरी उत्पादक कंपनी, पारस येथे स्व. वसंतराव दांदळे खासगी कृषी उत्पादक कं., वक्रतुंड शेतकरी उत्पादक कं., थार एमआयडीसी, आगर रस्ता येथील अनंतकोटी कृषी उत्पादक कं., विवरा येथे जय पुंडलिक माऊली कृ. उ. कं., ए. ए. कारंजा शेतकरी उत्पादक कंपनी, मानोरा, संत गजानन महाराज नाविन्यपूर्ण कृषी प्रक्रिया सहकारी संस्था, रिसोड, राजगाव, देगाव, विदर्भ कृषी प्रक्रिया व पणन सहकारी संस्था, वाशिम, वैषल्या ॲग्रो फार्मर कं., लोणी, संत गुलाब महाराज शे. उ. कं. निंबोळी, मंगलमूर्ती शे. उ. कं., चोहट्टा बाजार, संत नरहरी महाराज शे. उ. कं., मुंडगाव, म्हैसने ॲग्रो फार्मर प्रो. कं., मनकी, वक्रतुंड शेतकरी प्रो. कं., तेल्हारा आदी केंद्रांवर नोंदणी सुरू आहे.

# अडगाव बु. येथे पिकांची नासाडी

**अडगाव बु. :** मध्यरात्री अडगाव बु. परिसरात मोठ्या प्रमाणात वादळी वारा होऊन अवकाळी पाऊस झाला.या नैसर्गिक संकटामुळे अडगाव बु. गावासह मंडळातील सर्वच गावांतील पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली असून शेतकरी हतबल झाला आहे.वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील ज्वारी, कांदा, गहू व हरभरा तसेच केळी या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गुरूवारच्या रात्री एक ते दीड वाजेपासून सतत दोन तासांपर्यत अडगाव परिसरात वादळी वाऱ्याचा जोर खूप मोठ्या प्रमाणात होता.

# भूमीअभिलेख उपअधीक्षक कार्यालयात भू-प्रणाम केंद्रांचा शुभारंभ

## ➲जलद,सुलभ सेवा

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी):**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार राज्यातील ३० उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयांच्या ठिकाणी नागरिकांच्या सुविधेसाठी अद्ययावत सोयींसह भू-प्रणाम केंद्र स्थापित करण्यात आले. त्यात अकोल्याचा समावेश असून, येथील केंद्राचे व्हर्च्युअल उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.जिल्हा भूमी अभिलेख अधिक्षक भारती खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनात भू प्रणाम केंद्र कार्यरत राहणार आहे.

यावेळी भूमी अभिलेख उपअधीक्षक पंकज पवार



यांच्यासह कार्यालयाचे कर्मचारी, नागरिक आदी उपस्थित होते नागरिकांच्या सेवेसाठी केंद्रात सेतू सेवा केंद्रही कार्यान्वित करण्यात आले असून, नागरिकांना भूमी अभिलेखविषयक सर्व प्रकारच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. पहिल्या टप्प्यात राज्यातील ३० कार्यालये निवडण्यात आली. त्यात अकोला कार्यालयाचा समावेश आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी स्वागत कक्ष, अभ्यागत कक्ष, स्वच्छतागृहे, सीसीटीव्ही, सूचनाफलक, फर्निचर, संगणक आदी सुविधा आहेत. नागरिकांना आवश्यक माहितीसाठी विविध फलक लावण्यात आले आहेत.

# विनयभंगाच्या गुन्ह्यांमध्ये आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी):**

दिनांक २८/०३/२०२५ रोजी अकोला जिल्हयामध्ये वेगवेगळया पोलीस स्टेशन च्या हद्दीमध्ये महीलेच्या विनयभंगाच्या घटना घडल्या याबाबत पोलीसांनी विनयभंगाचा गुन्हा तात्काळ नोंद करून आरोपीविरूध्द तात्काळ दोषारोपपत्र न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट केले आहे.

१) पो.स्टे. अकोट फ़ाईल अकोला येथे दिनांक २८/०३/२०२५ रोजी आरोपीविरूध्द अप.क्र.१६६/२५ कलम ७८,१२६(२) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचे तपास अधिकारी यांनी तत्परता दाखवत दिनांक २९/०३/२०२५ रोजी आरोपीविरूध्द सबळ पुरावा गोळा करून गुन्हयाचे दोषरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

२) पो.स्टे. पिंजर जि. अकोला येथे दिनांक ०१/०४/२०२५ रोजी आरोपीविरूध्द अप.क्र.७९ / २५ कलम ७४,७८,७९,२९६,३३३ बीएनएस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्हयाचे तपास अधिकारी यांनी तत्परता दाखवत दिनांक ०२/०४/२०२५ रोजी आरोपीविरुध्द सबळ पुरावा गोळा करून गुन्हयाचे दोषरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले .

३) तसेच पोलीस स्टेशन तेल्हारा येथे दिनांक २८/०३/२०२५ रोजी अप.क्र. ९३ / २५ कलम ७४, ३५२, ३(५) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद करून गुन्हयाचे तपास अधिकारी यांनी आरोपींविरुद्ध सबळ पुरावा गोळा करून जलद गतीने तपास करून आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दिनांक ०१/०४/२०२५ रोजी न्यायालयात दाखल केले आहे.

वरीलप्रमाणे अकोला पोलीस दलाने महीलांविरूध्द च्या तक्रारीची तात्काळ दखल घेत वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली महिलाविषयक गुन्हयांना आळा घालण्याकरीता आरोपींविरूध्द तत्परतेने कारवाई करण्यात येत असुन दोन गुन्हयामध्ये २४ तासाचे आत तसेच एका गुन्हयामध्ये ५ दिवसाचे आत गुन्हयाचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

महीलासंबधाने दाखल गुन्हयाचे दोषारोपपत्र न्यायालयात तत्परतेने सादर केल्यानंतर जलदगतीने महीलांना न्याय देण्याकरीता अकोला पोलीस प्रशासन कटिबध्द आहे.

# युवकाची धावत्या रेल्वेखाली आत्महत्या

**▪मुर्तिजापुर,दि ४ (प्रतिनिधी):**

येथील रेल्वे उड्डाण पुलानजीक रेल्वेसमोर उडी घेऊन ३० वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची घटना ३ एप्रिल रोजी दुपारी २.३० ते ३ वाजेच्या सुमारास घडली. मृतकाचे नाव अक्षय सुनील देशमुख असे असून, त्याला एक महिन्याचा मुलगा आहे.



मूर्तिजापूर येथील दर्यापूर उड्डाणपुलानजीक रेल्वे पोल क्रमांक ६२१/९ ते ६२२ दरम्यान अक्षय सुनील देशमुख (३०) रा. जामठी बु. याने गाडी क्रमांक १२८३३ डाउन अहमदाबाद सुपरफास्ट एक्स्प्रेसच्यासमोर ३ एप्रिल रोजी दुपारी २.३० ते ३ वाजेदरम्यान उडी घेऊन आत्महत्या केली. अक्षयच्या वडिलांच्या सांगण्यानुसार नुकतेच त्यास रेल्वे एसी कोच अटेंडंट म्हणून नागपूर येथे कंत्राटी पद्धतीने नोकरी करत होता.

त्यास दुपारी २ वाजता नागपूर येथे जाण्यासाठी वडिलांनी स्वतः मूर्तिजापूर रेल्वे स्थानकावर सोडले व ते जामठी (बु.) येथे परतीच्या प्रवासाला जात असतानाच अचानक अपघात घडल्याचा कॉल आला असल्याचे सुनील देशमुख यांनी बोलताना सांगितले.

# श्री क्षेत्र वेताळबाबा,ते पाटसुल,रस्त्याच्या

## ➲नित्कृष्ट दर्जाचे कामाच्या,चौकशीचे निर्देश

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी):**

जिल्ह्यातील गत काही दिवसापासून श्री क्षेत्र वेताळ बाबा ते पाटसुल, रेल्वे रस्त्याचा विवादित प्रश्न निर्माण झाला होता, आणि गिनीज बुक मध्ये नोंद घ्यावी या प्रकारचे काम जि प बांधकाम विभाग अकोला अकोट यांच्या नियंत्रणाखाली सदर व अधिकाऱ्यांनी केलेले आहे, वस्तुतः अशी आहे.

सदर कामे सन २०२० २१ चे मंजूर आहे, परंतु गावकऱ्यांच्या व तक्रार करता यांच्या तक्रारीनुसार वेताळबाबा या पावनभूम ीच्या रस्त्याचे काम हे २०२४ च्या मी जूनम ध्ये कंप्लिट झालेले आहे. अशी नागरिकांची माहिती आहे..सदर रस्त्यावर कोणत्याही प्रकारची जड वाहनाची वाहतुक नसताना सुध्दा रस्त्यावर मोठ्या भेगा पडल्या, व असल्याने या कामात भ्रष्टाचार झाल्याने संबधीत अधिकारी यांच्यावर चौकशी करून कठोर कारवाई करून, निलंबित करण्यात यावे, अशा मागणीची तक्रार,२४/३/२०२५ रोजी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे, रयत शेतकरी संघटनेचे विदर्भ युवा अध्यक्ष पुर्णाजी खोडके यांनी व प्रभाकर बोरकर यांनी केली होती,सदरिल तक्रारींची दखल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, यांना श्रीक्षेत्र वेताळबाबा ते पाटसुल रेल्वे रस्त्याचे काम सन २०२३-२४ साली करण्यात आले असून सदर रस्त्यावर कोणत्याही प्रकारची जड वाहनाची वाहतुक नसताना सुध्दा रस्त्यावर मोठ्या भेगा पडल्या असल्याने या कामात भ्रष्टाचार झाल्याने संबधीत दोषीविरुध्द कारवाई करणे बाबत संदभभीय तक्रारीत नमूद केले आहे.तक्रारीतील मुद्दा गंभीर स्वरुपाचा असल्याने या व्दारे सदर्द्ध कामाबाबत आपण स्वतः चौकशी करून प्रकरणी दोषीविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी.

आपणाकडून सात दिवसांचे आत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाही बाबत चौकशी करून, कारवाई करण्यात यावी, व अहवाल , मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात यावा असे निर्देश, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता यांना दि २९,३,२०२५ रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी दिले आहेत. तसेच, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी, संबंधित अधिकाऱ्यांवर, चौकशी करून कठोर कारवाई करण्याचे, आश्वासन तक्रार कर्ते यांना,१,४,२०२५ रोजी दिले आहेत,आता या प्रकरणी संदर्भात, कोणती कारवाई होणार या कडे, संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### मराठा सेवा संघ कार्यालयात नियोजन बैठक



**अकोला :** जिजाऊ रथयात्रा मराठा जोडो अभियान - २०२५ येत्या १९ एप्रिल २०२५ रोजी अकोला जिल्ह्यात प्रवेश करणार असून या जिजाऊ रथयात्रा मराठा जोडो अभियान अकोला जिल्ह्यातील कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन करण्यासाठी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य प्रशांत जनोळकर यांचे अध्यक्षतेखाली मराठा सेवा संघ कार्यालयात नियोजन सभा घेण्यात आली. अकोला जिह्यातील जिजाऊ रथयात्रेचा मार्ग, सभास्थळ, निवासव्यवस्था, भोजन व्यवस्था, प्रचार व प्रसार करणे आदी विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. तसेच अकोला शहरातील सर्व सामजिक संघटनांची संयुक्त सभा लवकरच आयोजित करण्याचे ठरले. या सभेत हिवरखेड येथील स्मृतिशेष हेमंत उमेश गावंडे या समाज बांधवास आदरांजली अर्पण करण्यात आली. या सभेला डॉ. रणजित कोरडे सुनिल जनोरकर, डॉ. सीमा तायडे, प्रतिभा मते, दिवाकर पाटील, विजय टाले, विजय जाधव, अरुण गावंडे, प्रदीप चोरे, निलेश पाटील, राम मुळे, श्रीकांत खाडे, प्रा. दिलीप आंबेकर, अतुल अंधारे, राजेश खुमकर, शरद वानखडे, अतुल देशमुख, पंकज जायले, नमन आंबेकर, आकाश कराळे, अजिंक्य खाडे, जगदिश वाघ, ॲड. धनंजय गावंडे, विकास गावंडे, राजेश गावंडे, दिलीप देशमुख, विनोद साबळे तसेच मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व विविध कक्षाचे आजी - माजी पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, समाज बांधव - भगिनी, हितचिंतक उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी):**

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षातून नागरिकांना वैद्यकीय उपचारासाठी अर्थसाह्य सहजपणे उपलब्ध व्हावे यासाठी अकोल्यात सहायता कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीतील पहिल्या मजल्यावर मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू करण्यात आला आहे. नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या प्रकरणांची माहिती जिल्ह्यातच उपलब्ध होणार आहे, अशी माहिती अधिक्षक श्याम धनमने यांनी दिली. गरजू नागरिकांनी विहित नमुन्यातील अर्ज, आवश्यक कागदपत्रांसह मुख्यमंत्री वैद्यकीय निधी सहायता कक्षात सादर करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# कासमपुर (पळसो) येथील नागरीकांनी पाणी शुध्दीकरण करुनच प्यावे

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी):**

दि. ०४.०४.२०२५ मौजे कासमपुर ( पळसो) ता. अकोला या गावामधील एक रुग्ण ( पुरुष ) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे उपचार घेत असतांना कॉलरा चाचणी मध्ये बाधीत आढळुन आल्याने मौजे कासमपुर ( पळसो) येथे दि. ३०.३.२५ पासुन कॉलराचा उद्रेक जाहीर करण्यात आला आहे. उद्रेक प्रतिबंध संदर्भाने जिल्हास्तरीय पथक व तालुका स्तरीय पथकाने प्रत्यक्ष कासमपुर ( पळसो ) येथे जावुन प्रतिबंधात्मक तथा उपचारात्मक कार्यवाही अंमलात आणण्याचे अनुषंगिक



कार्यवाही केली. विलगीकरण कक्ष व संदर्भ सेवा -सद्यस्थितीत सर्व्हेक्षण करण्यात येत असुन प्रा. आ. केंद्र पळसो येथे रुग्णांना औषधोपचार करण्यात येत आहे. तसेच दि.२.४.२५ रोजी शा. वै.महा. अकोला येथुन कॉलरा बाधीत रुग्णाला सुटी देण्यात आली आहे.जिल्हास्तरीय अधिकारी यांच्या भेटी व मार्गदर्शनजिल्हास्तरावरुन मा. जिल्हाधिकारी, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मा.उपसंचालक आरोग्य सेवा अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ३१.३.२०२५ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी तर दि.१.४.२५ रोजी अति. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तसेच जिल्हा सर्व्हेक्षण अधिकारी, व तालुका आरोग्य अधिकारी अकोला यांच्या पथकाने मौजे कासमपुर ( पळसो) येथे भेट देवुन संबधीत अधिकारी व कर्मचारी यांना साथ नियंत्रणाकरीता सुचना दिल्यात.तसेच मा. जिल्हाधिकारी, अकोला यांनी दुरध्वनीव्दारे उद्रेकाची माहिती घेवुन परिस्थीती नियंत्रणात आणणेकरीता मोलाचे मार्गदर्शन आरोग्य विभागाचे अधिकारी यांना केले.

सदरची माहिती आरोग्य विभाग जि.प. अकोला यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे.

नागरीकांना ताप, मळमळ, पोटदुखी, हगवण, डोकेदुखी इत्यादी कोणतेही लक्षणे असल्यास त्वरीत गावात असलेल्या प्रा. आ. केंद्र पळसो येथे तपासणी करुन घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# प्रपंचातील अखंड भक्ती प्रभूप्राप्तीसाठी आवश्यक- पू शेखरबुवा व्यास

## ➲मोठ्या राम मंदिरात रविवारी राम जन्मोत्सव

**▪अकोला,दि ४ (प्रतिनिधी):**

अनेक संतांनी प्रपंच तत्कालीन व्यवस्थेत प्रभूप्राप्तीसाठी नाकारला आहे. प्रपंच हा भक्तिमार्गात अडसर वाटत असला तरी प्रपंचात राहूनही केलेली भगवंत भक्ती ही प्रापंचिक व्यक्तीसाठी अत्यावशक बाब असून प्रापंचिक व्यक्तीने नित्य प्रभू स्मरण करीत भगवंताची भक्ती करण्याच्या हितोपदेश तळेगाव दाभाडे येथील कीर्तनकार शेखर बुवा व्यास यांनी केला.टिळक रस्त्यावरील मोठ्या राम मंदिरात सुरू असलेल्या रामनवमी उत्सवात शेखर बुवा व्यास कीर्तन करीत होते. त्यांनी आपल्या कीर्तनात प्रपंच व भक्तीची महीमा सांगितली. ते म्हणाले,जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी प्रपंचाच्या संदर्भात विस्तृत उहापोह केला आहे. संत कधी प्रपंचात गुंतले नाहीत. संत ज्ञानेश्वर व रामदास स्वामी यांनी प्रपंच नाकारला. तथापि गृहस्थास नेटका व सत्शील



संसार करून या लौकिक व्यवस्थेतही आपल्या अढळ भक्तीने भगवंताच्या अनुग्रह प्राप्त होऊ शकतो. यासाठी सर्वप्रथम कोणत्याही पद्धतीने केलेली भक्ती आवश्यक असल्याचे मत हभप व्यास बुवा यांनी यावेळी व्यक्त केले. तथापि जो प्रपंचात बुडाला व भगवंताला विसरला त्याचे आयुष्य वाया गेले समजा. कारण प्रपंचात गर्व, अहंकार, लोभ, माया या गोष्टीचा प्रादुर्भाव जास्त असतो. म्हणून अशा गुणात्म क व्यवस्थेतही प्रभुभक्तीची आस प्रापंचिक व्यक्तीला खऱ्या मार्गावर नेऊन त्याचे जीवन



कृतार्थ करु शकत असल्याचा हितोपदेश हभप व्यास बुवा यांनी यावेळी केला. यावेळी त्यांनी अनेक दाखले या संदर्भात देत शाश्वत सुखासाठी प्रभूभक्ती, नामस्मरण, सेवा ही बाब अत्यावश्यक असल्याचे सांगितले.यावेळी त्यांनी माता लक्ष्मीच्या गर्व हरणाची भक्तीमय कथा आपल्या संगीतमय कीर्तनात सादर करीत भक्तिभाव निर्माण केला. दरम्यान या सकाळी रक्तशर्करा शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले.श्याम के दिवाने गुपच्या माध्यमातून आयोजित या शिबिराचा शेकडो महिला पुरुषांनी लाभ घेतला.उत्सवात ज्ञानाई महिला भजन मंडळ दाबकी रोडच्या महिलांनी सुंदर भजने सादर केलेत. सायंकाळी सई रानडे यांनी नृत्य नाटिका सादर करीत भक्तिभाव निर्माण केला.या उत्सवात आज शनिवार दिनांक ५ एप्रिल रोजी दुपारी ३,-३० वाजता स्वरचना महिला भजनी मंडळचे भजने होणार असून दुपारी ४-३० वाजता राजपूतपुरा येथील रामभक्त मंडळाचे सुंदरकांड होणार आहे. राम नवमी दिन रविवार दिनांक ६ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता मंदिरात राम जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. सोमवार दिनांक ७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता गोपाल काला कीर्तन होऊन दुपारी ३ वाजता गजानन महिला भजन मंडळ व संध्याकाळी ५-३० वाजता श्रीराम व हरिहर पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. उत्सवाची समाप्ती मंगळवार दिनांक ८ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता सुंदरकांड व रात्री ८ वाजता एकादशी कीर्तनाने होणार आहे. पंचक्रोशीतील समस्त रामभक्त महिला पुरुषांनी प्राचीन अशा मोठ्या राम मंदिरातील या उत्सवाचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्रीराम व हरिहर संस्थान अकोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे ऐकून सर्वच मराठी माणसाच्या मनाला वेदना झाल्या आहेत. या सरकारच्या चुकीच्या पावलांमुळे महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली, असे म्हटल्यास अनुचित ठरणार नाही. पुरोगामी, सहिष्णू अशी ओळख असलेल्या आपल्या महाराष्ट्राला संपवायला निघालेल्या या सरकारचे सर्वोच्च न्यायालयानेच कानउघडणी केली ते बरेच झाले. अनेकजण ओरडून - ओरडून सांगत होते की, धर्मद्वेष अन् जातीद्वेषावर आपल्या राजकारणाच्या पोळ्या भाजू नका. तुमचा फायदा होईल, पण महाराष्ट्राचे नुकसान होईल. मात्र, सरकारने कानात बोळे घातले होते. सर्वोच्च न्यायालयानेच सरकारचे कान उघडले. सर्वोच्च न्यायालयाने सरकारची 'नपुंसक' अशी निर्भत्सना करताना धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या घटनांना सरकारला जबाबदार धरले आहे. राजकारण आणि धर्म वेगळं करण्याची वेळ आली आहे₹, असेही न्यायालयाने सरकारला सुनावले आहे. महाराष्ट्राला दंगलींची प्रयोगशाळा करू इच्छिणाऱ्यांना न्यायालयाने चांगलीच चपराक लगावली आहे. या सरकारमध्ये कोणी मर्द आहे का? याही पेक्षा स्पष्ट आणि योग्य पदवी महाराष्ट्र सरकारला सुप्रीम कोटार्ने दिली, ती म्हणजे नपुसंक. नपुंसक आणि नामर्द अर्थ एकच पण शब्द वेगळे. सरकारमध्ये असलेले सर्व नामर्द आहेत असे सुप्रीम कोर्टाचे म्हणणे आहे. या सरकारला कायदा सुव्यवस्था सांभाळता येत नाही. जाती धर्मात तेढ निर्माण करणे आणि त्याला खतपाणी देणे हेच सरकारचे काम सुरू आहे. निर्लज्ज, खोटारडे, कमिशनखोर, धार्मिक तेढ निर्माण करणारे आणि जनतेशी गद्दारी करणारे सरकार आहे. काय कारण असावे बरं सतत दुसऱ्या धर्माला नांवे ठेवण्याबद्दल.

या देशात हिंदु मुसलमान बांधव एकमेकांसाठी कुर्बान झाले आहेत. सुखदुःखात सामिल झाले आहेत. कोणत्याही प्रकारची दुर्भावना नसते. पण जातीयवादी राजकारणी मंडळींचे दुःख देखील लक्षात घ्या. पांच वर्षे राज्य चालवित असतांनाच त्यांना राजकारण खेळावं लागतेच. हिंदु मुस्लिमांच्या नात्यात दुही, संशय आणि दुष्मनीवरच राजकीय मंडळींचे भांडवल असते. दोन समाजात लावलेल्या आगीत आपली पोळी भाजून घेण्यात त्यांचा राजकीय स्वार्थ असतो. त्यामध्ये सध्याच्या राजकीय पक्षातील काही अर्धवटराव आणि अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेलेच अनेकजण आहेत. त्यांची बडबड म्हणजे माकडांच्या हातात कोलीत दिले आहे. मंत्रीमंडळातील नादान आणि उठवळ आमदारांच्या विरोधात कारवाई सोडाच. कान धरून जाब विचारायची देखील हिम्मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाही. याचा अर्थ संशयाची सुई मुख्यमंत्र्यांकडे जात आहे. अशा वेडपट, अल्प बुध्दी, अडाणी नेत्यांच्या विषारी वक्तव्यामुळे जातीपातीत तेढ निर्माण होत आहे. अलिकडच्या काळात अनेक ठिकाणी दंगली झाल्या आहेत. पण मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यावर कारवाई केलेली नाही. हे दुर्दैव आहे. इतिहासाचा अभ्यास नाही. वाचून बोलण्याची दानत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल जुजबी माहितीच्या आधारे थोबाडातून घाण बाहेर काढतात. औरंगजेबाचा वाद अशाच प्रकारचा आहे. संघाच्या नेत्यांनी आणि राज ठाकरेंनी आसूड ओढल्यावर सगळे भानावर आले. तोपर्यंत आपली डोकी गहाण ठेवली होती. मुख्यमंत्र्यांनाच त्यावर खुलासा करतांना घाम फुटला. इतिहास साक्षीला आहे. देशात हिंदु मुस्लिम समाजातील एकोपा, विश्वास आणि निष्ठा अबाधित आहे. एकमेकांवर निस्सीम प्रेम आणि आस्था आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी मुसलमानांनी बलिदान दिले आहे. ह्या एकोप्यात बिबवा घालण्याचे पाप सत्तेतील काही जातीयवादी मंडळी करत आहेत. मूळ इतर अनेक विषयांवरून लक्ष विचलित करण्यासाठी फालतू विषयांवर रान पेटवून दोन समाजात वातावरण पेटते ठेवले जात आहे. त्यापासून सावध रहावे लागणार आहे.

# राजकारण आणि धर्म वेगळं करण्याची वेळ आली आहे?





महाराष्ट्रातील जनतेला राज्य सरकारच्या भूमिकेपासून दूर जाऊन काही घटनांचा बोध घ्यावाच लागणार आहे. कारण 'सारे जहाँ से अच्छा हिंदुस्था हमारा' असे आपण म्हणतो ते काही सहज म्हणून नव्हे. तर काही घटनांचा गांभीर्यपूर्ण अभ्यास जनतेने देखील केला पाहिजे साधा उदाहरण आपण मस्साजोग या गावचे घेऊ या.

अतिशय भावपूर्ण प्रसंग होता तेथील. सर्वांचे डोळे ओलावणारा. मस्साजोग गावातील मुस्लिम बांधवांनी ईद साजरी केली नाही. गोडधोड केले नाही आणि ते सर्वजण स्व. संतोष देशमुख ह्यांच्या कुटुंबाच्या दुःखात सामील झाले. ही भारताची, महाराष्ट्राची खरी सभ्यता, संस्कृती आणि ओळख याची शिकवण आहे. हाच आहे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा महाराष्ट्र. मुस्लिम समाजात स्वतःचा सख्खा भाऊ जरी वारला असल्यास तीन दिवसांनंतर सामान्य रीतिरिवाजाप्रमाणे त्या कुटुंबाने आपले जीवन पूर्ववत जगावे अशी प्रथा आहे.

मस्साजोगच्या मुस्लिम समाजाने ईद न साजरा करण्याचा निर्णय अनाकलनीय आहे, ऐतिहासिक आहे. सरपंच देशमुख यांच्या हत्येच्या दुःखात मस्साजोग येथील मुस्लिम बांधवांनी ना नवीन कपडे घेतले आणि ना आनंदात सण साजरा केला.

सर्व साधारण कष्टकरी हिंदू बांधवांना हे माहीत आहे की, मुस्लिम तुमच्या घराच्या शेजारचा आहे. सुखदुःखात सोबत असलेला, तुमच्या आमच्या सारखाच हसणारा, रडणारा. आपल्या सोबत सकाळपासून राबणारा, आपल्या सारखाच शेतकरी, लहान सहान व्यवसायी, आपल्या सारखाच जेमतेम शिकलेला, न शिकलेला. आपल्या एवढाच धर्म ज्ञान असलेला. मात्र कोणीतरी येतो आणि डोक्यात मुसलमान शत्रू आहेत म्हणून वात पेटवून जातो. दाखले असे देतो जे तुमच्या आमच्या स्वतःच्या बापजाद्यांनी कधीच सांगितलेले नव्हते.

मुसलमानांचे दुष्कृत्य असे सांगून जातो जे कधीही तुमच्या जीवनातील प्रसंग नसतात. मात्र लोक बळी जातात आणि ज्यांना तुमच्या आमच्या छाताडावर बसून राज्य करायचे आहे, त्यांचेच हस्तक होऊन, कधीही वैर नसलेल्या मुस्लिमांवर हल्ले करण्यात पुढे असतात. ते राजे बादशाह राजकीय मुसलमान वेगळे आणि तुमच्या सोबत जगणारे कष्टकरी मुसलमान तुमचे बांधव आहेत, एवढे समजून भाडकविणाऱ्या लोकांच्या पेकाटात लाथ मारली पाहिजे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

राज्यात ईद साजरी होत असताना मस्साजोगमध्ये मुस्लिम बांधवांनी ईद साजरी केली नाही. दरवर्षी प्रमाणे आपले लाडके सरपंच आपल्यात नसल्याने मस्साजोग गावातील मुस्लिम बांधवांनी रमजान ईद उत्सव साजरा न करण्याचा निर्णय घेतला होता. सोबतच मुस्लिम समाज बांधवां कडून देशमुख कूटूंबाला भेट देऊन सांत्वन करण्यात आले. याप्रसंगी वातावरण अत्यंत भावूक झाले होते.

येथेच खरा भारत पहायला मिळाला. तर दुसरीकडे पवित्र रमजान महिन्यात एका मुस्लिम व खिच्चन बांधवांनी असे पवित्र कार्य केले की, धर्म व जातीच्या नावाखाली राजकारण करणाऱ्यांना त्यांची मान शरमेने खाली घालायला लावली.

पुणे येथील सुधीर किंकळे या रास्ता पेठ येथील वयाची सत्तरी गाठलेल्या वृध्दाचे निधन झाले होते. धर्माने खिश्चन असलेल्या मायकल साठे यानी त्यांचे मित्र जावेद खान यांना कॉल केला की, त्यांच्या शेजारच्या बिल्डिंग मध्ये राहणारे एकजण मृत पावले आहेत आणि त्यांना फक्त त्यांची बहीणच आहे जयश्री किंकळे. त्यांना कोणीही नातेवाईक नाहीत त्यामुळे तु त्यांचा अंत्यविधी करतोस का?

संपूर्ण माहिती घेऊन ते ससून रुग्णालयातील डेड हाउस मध्ये पोहोचले. तिथे पंचनामा सुरु होता आणि संध्याकाळ होणार होती. चौकशी केली असता मृतदेह मिळण्यास रात्र होणार होती. अंत्यविधी करुन टाकु या, असे ते बोलताच मृताच्या भगीनीने म्हटले की, आम्ही ब्राह्मण आहोत आणि सूर्यास्त झाल्यावर आम्ही अंत्यविधी करीत नाही. रमजान महिना चालु, त्यात दुसऱ्या दिवशी सर्वात मोठी रमजान रात्र आणि नमाजाचा धार्मिक दिवस.

तरीही जात, धर्म बाजूला ठेऊन जावेदभाई सकाळी लवकर उठले व सगळीच कामे बाजूला ठेऊन मायकलला बरोबर घेऊन वैकुंठ येथे पोहोचले आणि त्या ब्राह्मण कुटूंबियांचे नातेवाईक झाले आणि अंत्यसंस्कार पार पाडले. खरा भारत याच ठिकाणी दिसतो.

महाराष्ट्रात सध्या नेतेमंडळी धार्मिक, जातीय मुद्दे उकरून काढत दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा वाद सुरू आहे. हिंदू संघटनांकडून वांरवार एका समाजाला टार्गेट केलं जात असल्याचं दिसून येत आहे. हे सर्व राजकीय पातळीवर सुरू असलं तरी प्रत्यक्षात हिंदू-मुस्लीम एकतेने भारतात नांदत आहेत.याचीच परिणीती पुण्यातील या घटनेतून पाहायला मिळाली. जावेद खान मुस्लिम असूनही त्यांनी स्वतः हिंदू पद्धतीने अंत्यसंस्कार केला. सध्या राजकारण्यांकडून हिंदू-मुस्लीम असे धार्मिक वाद अगदी कबरीतून उकरून काढले जात आहेत. त्यात पुण्यातल्या जावेद खानने रमजानमध्ये उभारलेली ही समतेची गुढी खरंच कौतुकाची बाब आहे.

हिंदू व्यक्तींवर अंत्यसंस्कार करणारे पुण्यातील जावेद खान यांचं राज्यभरातून कौतुक केलं जात आहे. कोणी कितीही हिंदू-मुस्लीम केलं आणि इथली वीण उसवण्याचा प्रयत्न केला तरी ही माती इतकी कमजोर नाही की फुटीरतावादींच्या प्रयत्नांना खतपाणी घालेल. ■ ■ ■

## अनेक मान्यवर हिंदूना कुणी ठार मारले?

या देशात आहे हिंदू आणि मुस्लिमांमध्ये दुही निर्माण केली तर दीर्घकाळ सत्ता भोगता येईल एवढ्या एका कारणास्तव महाराष्ट्रातील दोन धर्मातील दरी वाढायला सुरुवात झाली आहे. परंतु नागरिक मात्र सावध झाले आहेत. त्यांनाही अंदाज आहे की, या मागची भूमिका काय असू शकते. पण बारकाईने विचार केला तर समजते की, समाजामध्ये संत महात्म्यांना मारण्याची भूमिका कोणी घेतली आहे? चक्रधर स्वामींना विष देणारे कोण होते? महात्मा बसवेश्वर यांना मारणारे, ज्ञानेश्वर आणि भावंडाचा छळ करणारे, संत रोहिदास, संत मीराबाईला मारणारे कोण होते? छत्रपती शिवाजी महाराजांना राजा म्हणून नाकारणारे कोण होते? छत्रपती संभाजी राजेंना पकडून देणारे कोण होते? राजर्षी शाहू महाराजांवर बॉम्ब स्फोट घडवून आणणारे कोण होते? महात्मा गांधींना ठार मारणारे कोण होते? नरेंद्र दाभोळकर यांचे मारेकरी कोण होते? गौरी लंकेश, गोविंद पानसरे यांना ठार मारणारे कोण होते? अशी अजून हजारो उदाहरणे शोधली तर निघतील. मात्र याचा एकच अर्थ निघतो, यादेशात ज्या ज्या महापुरुष, संत, महात्मा यांनी हिंदू समाजात समता, मानवता, बंधुता, न्याय ही मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला त्याला त्याला येथील विषमतावादी, धर्मांध संस्कृतीच्या ठेकेदारांनी ठार मारले. हा इथल्या देशाचा इतिहास आहे. इथल्या लोकांना भ्रमात, अज्ञानात, लाचारी आणि गुलामीत रहाण्यात सुख आणि आनंद वाटतो, हे इथले सत्य आहे!

## आता 'सौगात-ए- मोदी' नावाने उधळलेली रेवडी

भाजपने 'सौगात-ए- मोदी' नावाने उधळलेली रेवडी म्हणजे मुस्लिमांचे लांगुलचालन नाही बरं का! पण काँग्रेसने हज यात्रेसाठी दिलेले अनुदान मात्र मुस्लिमांचे लांगुलचालन असते. मोदींपासून फडणवीसांपर्यंत सगळ्या भाजपेई नेत्यांनी इफ्तार पाट्यांना हजेरी लावली तर त्याला धार्मिक सलोखा म्हणायचा आणि काँग्रेसपासून कम्युनिस्टापर्यंत विरोधी पक्षीयांनी इफ्तार पाट्यांना हजेरी लावली तर ते मात्र मुस्लिम लांगुलचालन होते बरं का! खरं म्हणजे भारताच्या इतिहासात एकही युद्ध दोन धर्मात झाल्याची कुठेही नोंद नाही. जी काही युध्ये झाली ती केवळ दोन राजांमध्ये झाली व तीही स्वतःचे साम्राज्य वाढवण्यासाठी झाली होती. म्हणूनच छ. शिवाजी महाराजांच्या सैन्यात जसे विविध अठरा पगड जातीतील लोक होते, तसेच मुस्लिम सैनिक आणि अधिकारी सुद्धा होते. छ.शिवाजी महाराजांचा वकील हा मुस्लिम होता तर अफजखानचा वकील एक ब्राम्हण होता. देशात बहुजन हिंदूंच्या मनात मुस्लिम राज्यकर्त्यांविषयी द्वेष निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक छ. संभाजी महाराज यांचा उल्लेख 'धर्मवीर' म्हणून करतात. एक असा संदेश द्यायचा आहे की छ. संभाजी महाराज हे स्वतःचा हिंदू धर्म वाचवण्यासाठी शहीद झाले होते आणि छ. शिवाजी महाराज आणि मोगलांतील युद्धे ही हिंदू विरुद्ध मुस्लिम अशी होती. पण वास्तव इतिहास वेगळाच आहे.

# मानवी कल्याणासाठी युध्द नाकारणारा सम्राट अशोक!

भारतीय इतिहासातील सर्वात महत्त्वाचा लोककल्याणकारी राजा ज्यांनी अखंड भारताचा नव्हे तर भारतासह बहुतांश भाग काबीज केला होता. भारतीय इतिहासात मौर्य साम्राज्याचे महत्व अनन्य साधारण आहे.

अशोक मौर्य हे भारतीय सम्राट आणि मौर्य घराण्यातील तिसरे शासक होते. मौर्य वंशातील सम्राट चंद्रगुप्तांपासुन ते सम्राट अशोकांपर्यंत प्रत्येक राजाने राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्वत्र क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. या राजाच्या परंपरेतील सम्राट अशोकाची इतिहासातील भुमिका अनेकार्थाने महत्वाची ठरली आहे.

अशोक हा बिंदुसार या मौर्य सम्राटाचा पुत्र होता. अशोक हा बिंदुसाराच्या अनेक पुत्रांमध्ये शेवटून दुसरा होता. त्यामुळे अशोक मौर्य सम्राट बनेल अशी कोणाची अपेक्षा नव्हती. परंतु अशोकची सेनानी बनण्याची क्षमता वादातीत होती. त्यामुळे साहजिकच इतर भावांचा त्यावरील दुःस्वास वाढला होता.

चंद्रगुप्त मौर्याने जेव्हा जैन धर्म स्वीकारून राज्य सुखाचा त्याग केला, त्यावेळेस त्याने तलवार फेकून दिली. ही तलवार शोधून अशोकाने आपल्या जवळच ठेवली. अशोक लहानपणी तापट व खोडकर होता. तसेच चांगला शिकारीही होता. त्याला तत्कालीन राजपुत्रांना मिळणारे सर्व शिक्षण मिळाले होते. त्याच्यातील सेनानीचे गुण ओळखून बिंदुसाराने तरुणपणी त्याला अवंतीचा उठाव मोडण्यास पाठवले होते, हे काम त्याने सहज पार पाडले.

प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये एक महान चक्रवती सम्राट म्हणून अशोकाला मान्यता मिळालेली आहे. तत्कालीन अशोकाचे शिलालेख याची साक्ष नोंदविणारे महत्त्वपूर्ण साधने आहेत. असा विश्वविजेता सम्राट अशोक ज्याला चक्रवर्ती आणि अशोक द ग्रेट या नावांनीही ओळखले जाते.

सम्राट अशोकांना भारताच्या इतिहासात ही सर्वात महान व शक्तिशाली सम्राट म्हणून स्थान दिले आहे, ते जगातील सर्वात महान सम्राट होते. प्राचीन भारताच्या परंपरेत चक्रवर्ती सम्राटांची पदवी ज्यांनी जनमानसावर तसेच भारताच्या मोठ्या भूभागावर राज्य केले अशाच महान सम्राटांना दिली जाते.

सम्राट अशोकांना चक्रवर्ती सम्राट असे म्हणतात, चक्रवर्ती सम्राट म्हणजे सम्राटांचा सम्राट. आजचा पाकिस्तान, अफगाणिस्तान पूर्वेकडे बांग्लादेश ते दक्षिणेकडे केरळ पर्यंत तसेच नेपाळ, भूतान, इराण, ताजिकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांमध्ये अशोकाच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. अत्यंत शूर आपल्या आयुष्यात एक ही युद्ध हरले नाही असे चक्रवर्ती सम्राट अशोक जगाच्या पाठीवर कोणीही होऊ शकला नाही.

सम्राट अशोकाचा जेवढा साम्राज्य विस्तार होता, तेवढा हा पूर्ण भारत देश पण नाही आणि जेवढे वर्षे मोर्य शासकांनी या देशावर राज्य केले, तेवढे इतर कोणीही त्यांच्या आधीही नाही आणि नंतर ही करु शकले नाही.

सम्राट अशोक सत्य, अहिंसा, प्रेम, सहिष्णूता आणि शाकाहारी जीवनप्रणाली यांचे थोर पुरस्कर्ते होते म्हणूनच एक अतिशय परोपकारी प्रशासक अशीच इतिहासात त्यांची ओळख झाली आहे. अशोकाने आपल्या प्रजाजनांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपल्या शिलालेखातून काही राजाज्ञा दिलेल्या आहेत.

अशोकाचे शिलालेख हे मौर्य इतिहासाचे महत्त्वाचे साधन म्हणून ओळखले जाते. सर्वप्रथम ब्रिटिश अभ्यासक जेम्स प्रिन्सेप यांना अशोकाचे शिलालेख १८३७ मध्ये वाचता आले, ते अनेक भाषांचे अभ्यासक होते. अशोकाचे शिलालेख हे ब्राह्मी, खरोष्टी आणि अरेमाइक या तीन लिपींमध्ये आढळलेले आहेत. त्यातील अनेक अभिलेख हे ब्राह्मी लिपीतील असून ते जेम्स प्रिन्सेप यांनी वाचले, त्यातूनच या चक्रवर्ती सम्राटाच्या आयुष्याची आणि एकूणच मौर्य साम्राज्याविषयीची सखोल माहिती ही अभ्यासकांना मिळालेली आहे.



पूर्वार्ध

अशोकाने आपल्या शिलालेखामध्ये स्वतःला देवानाम प्रिय असे संबोधले आहे. कलिंग युद्धानंतर त्याचे झालेले मनपरिवर्तन, त्यांनी स्वीकार केलेला बौद्धधर्म, बौद्ध धर्माची तत्त्वे आणि एकूणच धर्मप्रसाराचे कार्य, महामात्र यांची नेमणूक या सर्व घटनांचा उल्लेख हा शिलालेखात आलेला आहे. सम्राट अशोक हे या काळातील अखंड भारताचे पहिले चक्रवर्ती राजा होय. सम्राट याचा अर्थ ज्याचा रथ घोडा चारही दिशांना कुणीही अडवू शकत नाही असा पराक्रमी शासक व विजेता होय.

कलिंगचे युद्ध ही इतिहासातील एक अतिशय वेगळी घटना समजली जाते. बौद्ध धर्माचा जगभर झालेल्या प्रसारास खूप मोठ्या प्रमाणावर अशोकाने केलेले कार्य जबाबदार होते असे इतिहासकार मानतात. अशोकाने पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्माची तिसरी परिषद बोलावली होती, बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले.

अग्नेय अशिया आणि मध्य आशिया येथील देशांमध्ये त्याने धर्मप्रसारासाठी बौद्ध भिक्खू पाठवले होते त्याने अनेक स्तूप आणि विहार बांधले. त्याचप्रमाणे अशोकाने अनेक सोई निर्माण करण्यावर भर दिला. उदाहरणार्थ माणसांना तसेच पशूंना मोफत औषध उपचार मिळावे, याची त्यांनी सोय केली होती, अनेक नवे रस्ते बांधले, प्रवासामध्ये लोकांना सावली मिळावी यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडे लावली, नव्या धर्मशाळा बांधल्या, विहिरी खोदल्या, अशा प्रकारे त्याने अनेक लोकोपयोगी आणि कल्याणकारी कार्य केलं होतं. त्याचप्रमाणे बौद्ध धर्माचा मोठा प्रसार आणि प्रचार करण्याचे कामही अशोकाने केले.

धम्मचक्र परिवर्तन करणारा अशोक हा प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरला आहे इतिहासाला युगानुयुगे त्याची नोंद घ्यावी लागेल. मानवी कल्याणासाठी अथक प्रयत्न करणारा प्रजा हीच दक्ष व प्रजा कल्याणकारी शासक म्हणून अनेक इतिहासकारांनी अशोकाच्या कार्याचा गौरव केलेला आहे.

हा बौध्द सम्राट म्हणून अशोकाचा असा विश्वास होता की, बौध्द धर्म हा सर्व मानव तसेच प्राणी व वनस्पतीसाठी फायदेशीर आहे म्हणून त्यांनी अनेक स्तूप, सांघाराम, विहार, चैत्य आणि दक्षिण आशियातील बौध्द भिक्कुंचे विहार, मठ बांधले. त्यांनी बुध्दांच्या अवशेषांवर ८४ हजार स्तुप बांधण्यास आज्ञा दिली आणि ते तयार झालेत, याला इतिहास साक्षीदार आहे.

ही काहीशी अतिशयोक्ति असली तरी भारतात बऱ्याच ठिकाणी सम्राट अशोकाच्या कालखंडात स्तुप उभारले गेलेत, हे ऐतिहासिक सत्य आहे. त्यांच्या कायार्चा पुरावा ९० च्या दशकात सन्नतीच्या बौध्द स्थळाचा शोध. जे स्थळ कर्नाटकातील कलबुर्गी जिल्हयात भीमा नदीच्या काठावर. या स्थळाच्या पुनरुज्जीवनाचे काम सध्या हाती घेण्यात आले आहे.

अशोकानंतर राज्याला योग्य उत्तराधिकारी न लाभल्यामुळे मौर्य साम्राज्याचा ऱ्हास घडून आला विशाल आणि एकछत्री केंद्रीकृत राज्य उभारण्याचा प्रयत्न अखिल भारतीय स्तरावर सर्वप्रथम मौर्य सम्राट यांनी केला यामध्ये चंद्रगुप्त आणि सम्राट अशोक यांची कार्य खूप महत्त्वपूर्ण राहिलेली आहे अशोकाने बौद्ध धर्माची शिकवण देताना लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीला चालना दिली शांततेच्या मार्गाने कुठलेही राज्य जास्त काळ टिकू शकेल यावर त्याचा विश्वास निर्माण झाला बौद्ध धर्माच्या प्रसाराला त्याने चालना दिली, त्यासाठी शासकीय अधिकारी नेमले स्वतःच्या मुलांना त्याने धर्म प्रसारासाठी पाठवले . धम्मचक्र परिवर्तन करणारा अशोक हा प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरला आहे इतिहासाला युगानुयुगे त्याची नोंद घ्यावी लागेल मानवी कल्याणासाठी पथक प्रयत्न करणारा प्रजा हीच दक्ष व प्रजा कल्याणकारी शासक म्हणून अनेक इतिहासकारांनी अशोकाच्या कार्याचा गौरव केलेला आहे.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

(लेखाचा उर्वरीत भाग उद्या)

■ ■ ■

# बांगलादेशला धडा शिकवावा!

बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत केल्यानंतर नोबेल पारितोषिक विजेते मोहंमद युनूस यांची बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड करण्यात आली.

मोहंमद युनूस यांची बांगलादेश सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागतच केले. त्यांच्या कारकिर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे भारताला वाटले होते पण त्यांनी भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे सोडाच उलट भारताशी पंगा घेण्याचेच त्यांनी ठरवले आहे.

मोहंमद युनूस हे पाकिस्तान आणि चीनच्या कच्छपी लागले असून भारताला पाण्यात पाहत आहे. त्यांच्या कारकिर्दीत भारत बांगलादेश संबंध सुधारण्याऐवजी बिघडतच चालले आहे. मोहंमद युनुस हे सत्तेवर आल्यापासून काही ना काही कारणाने भारताची कुरापत काढून भारताशी पंगा घेत आहेत. याआधी त्यांनी जमाते इस्लामी या कट्टरपंथीय संघटनेवर घातलेली बंदी उठवली. याच संघटनेने बंदी उठल्यानंतर बांग्लादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू धर्मीय नागरिकांवर हल्ले केले.

भारताने हे हिंदूंवर होणारे हल्ले रोखावेत अशी विनंती त्यांच्याकडे केली पण त्यांनी त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले त्यामुळे दोन्ही देशातील संबंध बिघडले हे संबंध पूर्ववत करण्या ऐवजी ते हे संबंध कसे बिघडतील हेच पाहत राहिले. भारताला डिवचण्यासाठी त्यांनी पाकिस्तान आणि चीनला जवळ केले.

काही दिवसापूर्वी पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेचे म्हणजे आय एस आय चे चार अधिकारी बांगलादेश दौऱ्यावर गेले होते. या अधिकाऱ्यांचे बांग्लादेशात जंगी स्वागत करण्यात आले. या अधिकाऱ्यांनी मोहंमद युनूस यांच्याशी चर्चा केली . या चर्चेचा अजेंडा काय होता हे समोर आले नसले तरी यात काय चर्चा झाली असेल हे सांगायला तज्ज्ञांची गरज नाही.

या चर्चेनंतर मोहंमद युनूस यांनी पाकिस्तानचे तोंडभरून कौतुक केले. भारताने यावर थेट मतप्रदर्शन केले नसले तरी त्यांनी पाकला जवळ करून भारताला खिजवले हे मात्र नक्की. पाकला जवळ करत भारताशी पंगा घेऊन मोहंमद युनूस शांत बसले नाही आता तर त्यांनी थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले आहे.

मोहंमद युनूस हे चार दिवसीय चीनच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यासोबत ९ करार केले. जे करताना त्यांनी चीनला खुश करण्याचा नादात थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले. या दौऱ्यात त्यांनी म्हंटले आहे की भारताच्या पूर्वोत्तर राज्यांना समुद्र लागून नाही. ही राज्ये पूर्णपणे जमिनीनी वेढलेली असल्याने चीनने या संधीचा फायदा घेऊन आपला प्रभाव वाढवावा.

हे वक्तव्य करून त्यांनी एकप्रकारे चीनला भारताच्या ईशान्येकडील राज्यावर आक्रमण करावे असे चिथावले आहे. इतके करून ते थांबले नाही तर ते पुढे म्हणतात भारताच्या ईशान्येकडील राज्यांना केवळ जमीन आहे त्यांना समुद्र नाही. समुद्र फक्त बांगलादेशला आहे. समुद्राचे स्वामित्व फक्त बांगलादेश कडेच आहे आणि बांगलादेश हाच समुद्राचा रक्षक आहे.

मोहंमद युनूस यांचे हे वक्तव्य अतिशय आक्षेपार्ह आणि निषेधार्ह आहे. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे भारताला घेराव घालण्यासाठी चीनला आव्हान करणारे आहे. मोहंमद युनूस यांचे हे चिथावणीखोर वक्तव्य भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारेच आहे. ईशान्य भारताच्या सुरक्षिततेसाठी बांगलादेश सरकारचा हा दृष्टिकोन अत्यंत धोकादायक आहे. भारताने मोहंमद युनूस यांच्या या वक्तव्याची कडक शब्दात निंदा करायला हवी. बांगलादेशसारखा देश ज्याच्या स्वातंत्र्याला भारताने मदत केली तोच देश आता भारताच्या विरोधात जात आहे.

इतकेच नाही तर थेट भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे, हे दुर्दैवी आहे . याला आळा बसायला हवा. त्यासाठी बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यायला हवी. बांगलादेशने त्यांची ही नसती उठाठेव बंद केली नाही तर भारत त्यांना त्यांची जागा दाखवून देईल असा इशाराच भारताने द्यायला हवा.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■

# मधुमेहाच्या रूग्णांनी आंबा खावा की नाही?



उन्हाळ्यात शरीराला निरोगी ठेवण्यासाठी आहारामध्ये पोषक तत्वांचा समावेश करू शकता. आता आंब्याचा हंगामही सुरू झाला आहे. आपल्यापैकी क्वचितच असा कोणी असेल ज्याला आंबा आवडत नाही. परंतु त्याच्या गोड चवीमुळे, मधुमेही रुग्ण आंबा खाऊ शकतात का असा प्रश्न उपस्थित होतो.

आंबा हा अनेक सूक्ष्म पोषक घटकांचा स्त्रोत आहे. त्यात कार्बोहायड्रेट्स, प्रथिने, अमीनो आम्ल, लिपिड्स आणि फायबर असतात. आंब्यामध्ये कोलेस्टेरॉल नसते. आंब्यातील सूक्ष्म पोषक घटकांमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस, लोह आणि जीवनसत्त्वे अ आणि क यांचा समावेश आहे. १०० ग्रॅम आंबा खाल्ल्याने ६०-९० कॅलरीज मिळतात.

आंब्यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त आणि चरबीचे प्रमाण कमी असते. याशिवाय, ते सामान्य हृदयरोग तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांपासून देखील संरक्षण करते. जर तुम्ही योग्य प्रमाणात आंबा खाल्ला तर त्यात असलेले फायबर पचन सुधारते.

परंतु मधुमेहाच्या रुग्णांनी आंबा कमी प्रमाणात खावा. आंब्याचा ग्लायसेमिक इंडेक्स ५१ आहे. त्यामुळे लोक मर्यादित प्रमाणात आंबा खाऊ शकतात. फळांचा गोडवा त्यांच्यामध्ये असलेल्या फ्रुक्टोजमुळे असतो आणि फ्रुक्टोज रक्तातील साखरेची पातळी वाढवत नाही.

आंब्यामध्ये अनेक पौष्टिक गुणधर्म आहेत. त्यात कार्बोहायड्रेट्स, प्रथिने, फायबर, कॅल्शियम, व्हिटॅमिन ए, के, बी ६, बी १२ आणि इतर अनेक पोषक घटक असतात. म्हणून, मधुमेही रुग्ण आंबे खाऊ शकतात, परंतु मर्यादित प्रमाणात . परंतु बटाटे, इतर धान्ये, तळलेले पदार्थ आणि उच्च कार्बयुक्त पदार्थांसह आंबे खाणे टाळावे. ज्यांना मधुमेह आहे त्यांनी काळजी घ्यावी.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### वारसा ..।

शिवरायांचे आम्हीस वारसदार
दावा करतो प्रत्येक पुढारी
पण त्यांच्या सारखी -
दिसते का हो कर्तबगारी ? ..

देशाचे सोडा, राज्याला तरी
देऊ शकता का स्थिर सरकार
कशाला उगाच
फुशारक्या मारता यार ..

जन्माने नव्हे कर्माने मिळतो
शिवरायांचा वारसा
हेच आम्ही विसरतो
म्हणून होतो हशा ..।

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने जागतिक क्षयरोग दिन २०२५ चे औचित्य साधत सुरु केले टीबी हेल्थकेअर पॅकेज




**नागपूर, ४ एप्रिल :** १८८२ साली डॉ. रॉबर्ट कॉख यांच्याद्वारे लागलेल्या टीबी जंतू शोधाच्या स्मरणार्थ दरवर्षी जागतिक क्षयरोग (टीबी) दिन साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) या दिवसाचे आयोजन करून टीबीविषयी जागरूकता वाढवते आणि या आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांना प्रोत्साहन देते. भारताने २०३० पर्यंत टीबी निर्मूलनाचे उद्दिष्ट ठेवले आहे, ज्यामध्ये टीबीची प्रकरणे ८०% कमी करणे, टीबीमुळे होणारे मृत्यू ९०% कमी करणे आणि या आजारामुळे प्रभावित कुटुंबांवरील उपचाराचा आर्थिक भार पूर्णतः हटवणे याचा समावेश आहे.

दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च संस्थेचे ऑफ कॅम्पस संचालक डॉ. अनुप मरार यांनी या पॅकेजचे नागपूरमधील टीबी निर्मूलनासाठी असलेले महत्त्व स्पष्ट केले. या पॅकेजमध्ये विशेषज्ञ सल्ला, सर्वसाधारण आरोग्य तपासणी, थुंकी तपासणी तसेच पूर्ण रक्ततपासणी (सीबीसी), लिव्हर व किडनी कार्य तपासणी आणि साखर तपासणी (आरबीएस) यांसारख्या प्राथमिक आरोग्य तपासण्या समाविष्ट आहेत. याशिवाय, रुग्णांना ईसीजी, पोटाची अल्ट्रासोनोग्राफी आणि छातीचा एक्स-रे सुद्धा उपलब्ध करून दिला जाणार आहे. टीबीवरील उपचारात खंड न पडू देता ते उपचाराच्या पूर्ण कालावधीसाठी चालू ठेवावे म्हणून रुग्णांचे विशेषज्ञाद्वारा मानसिक समुपदेशन देखील केले जाईल. नागपूर आणि भोवतालच्या जिल्ह्यातील सर्व टीबी रुग्णांसाठी हे पॅकेज उपलब्ध आहे.

डीएमएमसीचे श्वसन रोग विभाग प्रमुख व प्राध्यापक डॉ. सुमेर चौधरी यांनी टीबी रुग्णांसाठी उच्च दर्जाची आरोग्यसेवा देण्याच्या तसेच कोविडनंतरच्या आरोग्य गुंतागुंती, अस्थमा आणि इतर श्वसन विकारांवर उपचार देण्याच्या एसएमएचआरसीच्या वचनबद्धतेला पुन्हा एकदा अधोरेखित केले. एसएमएचआरसीमध्ये २० खाटांचा सुसज्ज श्वसन विभाग आणि ५ खाटांचे विलगीकरण कक्ष उपलब्ध आहे जे टीबीचा जंतुसंसर्ग असलेल्या प्रकरणांसाठी वापरला जातो. संस्थेच्या प्रगत निदान सुविधांमध्ये स्पुटम ट्रू-नॅट टेस्टिंग (ड्रग रेझिस्टंट टीबी लवकर ओळखण्यासाठी) आणि फायबर-ऑप्टिक ब्रॉन्कोस्कोपी (श्वसन तंत्राची सखोल तपासणी) देखील उपलब्ध आहे.

या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा क्षयरोग अधिकारी (डीटीओ) आणि हिंगणा तालुका आरोग्य अधिकारी, यांच्यासह प्रमुख शासकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. त्यांनी एसएमएचआरसीच्या सार्वजनिक आरोग्य उपक्रमांना बळकट करण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांच्या उपस्थितीमुळे टीबी आणि इतर सार्वजनिक आरोग्य समस्यांवर मात करण्यासाठी आवश्यक असलेले सरकारी संस्था आणि आरोग्य केंद्रांमधील सहकार्याचे महत्त्व अधोरेखित झाले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. शफी खान, डॉ. गौरांग औरंगाबादकर आणि संपूर्ण श्वसन रोग विभागाच्या अथक परिश्रमांमुळे शक्य झाले. डीएमएमसीचे अधिष्ठाता डॉ. उज्वल गजबे, एसएमएचआरसीचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत गावंडे, सहायक वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुधीर सिंह आणि सामुदायिक सेवा विभागाचे उपसंचालक डॉ. नरेश गिल यांचे विशेष मार्गदर्शन या कार्यक्रमास लाभले.

हा उपक्रम प्रदेशातील टीबी निर्मूलनासाठी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे आणि ज्या लोकांना या आरोग्य सेवांची गरज आहे त्यांच्यासाठी उच्च प्रतीची आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण प्रयत्न आहे.

# क्वालिटी वॉल्सकडून गोल्डन स्पून हा नवीन ब्रँड बाजारात




**नागपूर, ४ एप्रिल :** भारतात आईस्क्रीम श्रेणीचा झपाट्याने विस्तार होत आहे. क्वालिटी वॉल्सने ही श्रेणी सर्वांसाठी आनंददायी बनवण्याच्या महत्त्वाकांक्षेसह गोल्डन स्पून ही घरात उपलब्ध असलेल्या स्वादिष्ट मिष्टान्नांची एक सुलभ श्रेणी आणली आहे. ग्राहकांना आनंद देण्याच्या ब्रँडच्या तत्वज्ञानाशी प्रामाणिक राहून ही नवीन श्रेणी कुटुंबांना एकत्र आणण्याचे आणि दररोजच्या लहानमोठ्या क्षणांचे आठवणींमध्ये रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

सदाबहार क्लासिक्सपासून ते आगळ्यावेगळ्या चवींसह गोल्डन स्पून चार अप्रतिम पर्याय ऑफर करते: क्लासिक व्हॅनिला; मिठाई मॅजिक. ही बुंदी घातलेल्या पारंपारिक भारतीय मिठाईचे आधुनिक रूप आहे; २-इन-१ चॉकलेट व्हॅनिला आणि २-इन-१ मँगो व्हॅनिला, जे ग्राहकांना त्यांच्या घरच्या घरी एकाच स्कूपमध्ये दोन फ्लेवर्सचा अनुभव देतात.

एचयूएलच्या आईस्क्रीम व्यवसायाचे प्रमुख तोलोय तानरीदागली म्हणाले, आमचा नवीन ब्रँड गोल्डन स्पून भारतीय कुटुंबे आणि मित्रांमध्ये एकता वाढवण्याचा उद्देश ठेवतो. घरी उन्हाळी मेजवानी घेण्याचा आनंद जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवून आम्ही ग्राहकांना दोन्ही जगातील सर्वोत्तम देत आहोत. भारत ही आईस्क्रीम आणि फ्रोझन डेझर्ट्ससाठी वेगाने वाढणारी बाजारपेठ आहे. तरीही ती सर्वांना उपलब्ध नाहीत. गोल्डन स्पून ही विद्यमान दरी भरून काढण्यासाठी आणि आमची उपस्थिती वेगाने वाढवण्यासाठी आमची प्रतिक्रिया आहे. अशा नवीन आणि रोमांचक चवींसह सर्वांना आनंद पसरवण्याच्या आमच्या प्रवासाला गती मिळेल अशी आशा आहे.

आपल्या नवीन जाहिरात आणि या उत्पादनाबाबत बोलताना ब्रँड ॲम्बेसेडर काजोल देवगन म्हणाल्या, मागील काही वर्षांपासून क्वालिटी वॉल्सशी माझे नाते आहे. गोल्डन स्पून आणणे हे कंपनीने अनोखे फ्लेवर्स सादर करण्यासाठी उचललेले एक रोमांचक पाऊल आहे. मला वैयक्तिकरित्या मिठाई मॅजिक आणि ऑल-टाइम क्लासिक २-इन-१ पॅक खूप आवडतात. ही जाहिरात मी पहिल्यांदा गोल्डन स्पून वापरून पाहिल्यावर मला मिळालेल्या आनंदाचे प्रतिबिंब आहे. एचयूएल टीमसोबत या मोहिमेचे शूटिंग करणे हा एक आनंददायी अनुभव होता.

# लोकप्रिय टेलिव्हिजन अभिनेता आर्यन सिंग राजपूत सामिल होत आहे कुमकुम भाग्यच्या कलाकारांमध्ये



**मुंबई, ४ एप्रिल :** झी टीव्हीवरील कुमकुम भाग्य ने हल्लीच रोमांचक अशी नवीन पिढीची झेप घेतली असून आता नवीन नाट्य, सखोल भावना आणि अनपेक्षित वळणे घेऊन ताज्या दमाचा काळ घेऊन ही मालिका येत आहे. ह्या मनोरंजनात भर टाकत लोकप्रिय टेलिव्हिजन अभिनेता आर्यन सिंग राजपूत मालिकेत मयांकच्या भूमिकेत शक्तीशाली प्रवेश करत आहे. तो रौनक (अक्षय देव बिंद्रा) चा जवळचा मित्र असून भारतात आपल्या मित्राच्या लग्नासाठी आला आहे पण ह्या मालिकेतील त्याच्या प्रवेशामुळे कथानकामध्ये नवीन डायनॅमिक्स निर्माण होणार असून त्यामुळे प्रेक्षक आपल्या खुर्च्यांना खिळून राहतील.

रहस्यमयी आणि तरीही लाघवी असे व्यक्तिमत्त्व असलेला मयांक कथेमध्ये ताजा दृष्टीकोन आणतो कारण तो रौनक आणि प्रार्थना (प्रणाली राठोड) यांच्यामधील क्यूपिड बनला असून प्रार्थनावरील आपले प्रेम समजून घेण्यासाठी तो रौनकची मदत करत आहे आणि त्याचसोबत त्याची स्वतःची अशी काही गुपितेही आहेत. प्रार्थनाचे भावेशसोबत होणारे लग्न थांबवण्याच्या मिशनसह आगामी ट्रॅक प्रेक्षकांना खिळवून ठेवेल अशी अपेक्षा आहे. ह्या कथानकामध्ये त्याची व्यक्तिरेखा कशाप्रकारे प्रभाव पाडेल, नवीन वळणे कशाप्रकारे आणेल आणि मालिकेत सरप्राईजेस कशी निर्माण करेल याबद्दल चाहते अतिशय उत्सुक आहेत.

ह्या मालिकेतील आपल्या प्रवेशाबद्दल अतिशय उत्साहाने आर्यन सिंग राजपूत म्हणाला, कुमकुम भाग्य सारख्या आयकॉनिक शो चा हिस्सा बनण्याची संधी मला मिळत आहे याबद्दल मी अतिशय उत्साहात आहे. ही मालिका घराघरांत लाडकी असून ह्या जगात पाऊल ठेवणे हा माझा सन्मानच आहे. माझी व्यक्तिरेखा मयांक ह्या कथेमध्ये ताजी ऊर्जा आणि नवीन दृष्टीकोन आणते आणि त्याचा प्रवास कसा उलगडतो हे प्रेक्षकांनी पाहावे यासाठी मी उत्सुक आहे. तो चार्मिंग पण बेभरवशी आहे ज्यामुळे त्याची व्यक्तिरेखा आणखी रोमांचक बनते. अक्षय आणि प्रणाली यांसारख्या गुणी कलाकारांसोबत काम करण्याचा अनुभव छान राहिला आहे.

मयांकच्या प्रवेशासह कुमकुम भाग्य प्रेम आणि ताकदीच्या संघर्षाचा जबरदस्त मिलाफ दाखवण्याचे वचन देते. प्रेक्षकांसाठी हे पाहणे रोचक असेल की काय मयांक रौनकला प्रार्थनावरील त्याच्या प्रेमाची ओळख पटवून देईल? की प्रार्थनाचे भावेशसोबत लग्न होईल?

# सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेत हनुमानाला देवांकडून अद्वितीय शक्ती मिळतात, पण अनपेक्षित घडामोडींमुळे त्याचा मार्ग आव्हानात्मक होतो



**मुंबई, ४ एप्रिल :** सोनी सबवरील वीर हनुमान या भव्य मालिकेने हनुमानाची कालातीत कथा नवीन पद्धतीने मांडून प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. खोडकर बाल मारूतीचे एका सामर्थ्यशाली भगवान हनुमानात रूपांतर होण्याचा प्रवास मांडणाऱ्या या मालिकेत हनुमानाच्या धैर्याची, निरागसतेची आणि दिव्यत्वाची कथा सुंदर पद्धतीने विशद केली आहे. यामध्ये आन तिवारी बाल मारुतीची भूमिका साकारत आहे, आरव चौधरी केसरीची, सायली साळुंखे अंजनीची तर माहिर पांधी वाली व सुग्रीवची दुहेरी भूमिका साकारत आहे.वीर हनुमान ही मालिका दर सोमवार ते शनिवार रात्री ७:३० वाजता प्रसारित होत असून प्रेक्षकांना भक्तिरसाचा आणि नाट्यमयतेचा आस्वाद देत आहे.

आगामी भागांमध्ये, प्रेक्षक मारुतीच्या आयुष्यातील एका लक्षणीय घटनेचे साक्षीदार होणार आहेत. हनुमानाला देवांकडून दिव्य वरदान मिळते. एक एक करून देव त्याला वेगवेगळ्या असामान्य शक्ती प्रदान करतात. या सगळ्या दैवी वरदानांमुळे तो जवळजवळ अजिंक्य होऊन जातो. त्याला ज्या विविध शक्ती मिळतात, त्यापैकी इच्छेनुसार आपला आकार बदलण्याची शक्ती, कितीही अंतर सहजपणे कापण्याची शक्ती, कोणत्याही शस्त्राकडून त्याला नुकसान होणार नाही असे सामर्थ्य मिळते. त्याचे शरीर वज्राहून कठीण आणि आग, पाणी व रोगांपासून अभेद्य बनते. आपल्या इच्छेनुसार आपले आकारमान बदलण्याची शक्ती त्याला मिळते. तो दिव्य ऊर्जा उत्सर्जित करणाऱ्या शक्तीचे मूर्तिमंत रूप बनून जातो. त्याला अमरत्वाचे वरदान मिळते, जीवनानंतरच्या आपत्तींपासून सुटका मिळते, कोणत्याही प्रकारे त्याच्या शरीराला हानी होणार नाही, असे वरदान मिळते. आणि स्वरक्षणासाठी त्याला एक भली मोठी गदा देखील वरदानाच्या रूपात मिळते. या शारीरिक क्षमतांव्यतिरिक्त, त्याला एका महान योग्याचे ज्ञान प्राप्त होते. त्रैलोक्यातील सर्वात मोठा भक्त बनण्याचे त्याचे भवितव्य दृढ होते.

परंतु, स्वत्वाचा शोध घेण्याचा त्याचा प्रवास यामुळे सोपा होत नाही. आपल्याला मिळालेल्या शक्तींच्या दिव्यत्वाची प्रचिती त्याला हळूहळू येते, त्याचबरोबर काही अनपेक्षित आव्हाने त्याच्यासमोर येतात आणि खेळाच्या नादात त्याच्या हातून काही चुका घडतात, ज्याच्यामुळे त्याची नियती वेगळाच आकार घेते. आपल्या अफाट ताकदीची परीक्षा घेण्यापासून ते आपल्या क्षमतांवर नियंत्रण मिळवण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर त्याची कसोटी होते.

वीर हनुमान मालिकेत केसरीची भूमिका करणारा आरव चौधरी म्हणतो, प्रत्येक लहान मूल जसे नवनवीन गोष्टी शिकते, स्वतःला ओळखू लागते, तसेच हनुमानाचेही बालपण आहे. त्याला मिळालेल्या दिव्य शक्तींमुळे तो इतरांपेक्षा खूप वरचढ आणि असामान्य होतो, पण या शक्तींबरोबर एक जबाबदारी देखील येते. ज्यामुळे त्याच्या ताकदीची, सुजाणतेची आणि त्याच्या मनातील हेतूंची पदोपदी कसोटी होते. केसरी म्हणून,आपल्या वाढणाऱ्या, धडपडणाऱ्या मुलाकडे प्रेमाने, काळजीने पाहणाऱ्या एका पित्याच्या भावना मी पूर्णपणे समजू शकतो. त्याच्या लहानपणीच्या या धडपडण्यातून आणि पुन्हा सावरण्यातूनच तो एक दिवस पूजनीय दैवत बनणार आहे हे केसरी मनोमन जाणतो.

# झी टीव्हीवरील सरूमध्ये मोहक मटकर साकारत आहे प्रमुख भूमिका

**मुंबई, ३ एप्रिल :** भारतात छोट्या छोट्या शहरातील अनेक स्वप्नाळू आपल्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहत असतात. शिक्षण, खेळ आणि कला हे त्यांच्या स्वप्नांसाठी दरवाजे उघडत असले तरी मोठ्या शहराचा हा प्रवास त्यांच्या चिकाटीची परीक्षा पाहण्यासाठी त्यांच्यासमोर अनेक आव्हाने आणतो. प्रेरणादायी आणि आपल्याशा वाटतील अशा कथा सांगण्याच्या आपल्या वारशासाठी मानली जाणारी झी टीव्ही ही वाहिनी अशीच एक कथा सरू प्रस्तुत करत आहे. आपल्या छोट्या शहराच्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन स्वप्ने पाहण्याचे धाडस करणाऱ्या एका तरूण मुलीची ही रोचक कथा आहे.

सरस्वतीचे विश्व हे तिच्या गावातच वसलेले असून ही तिची आवडती जागा आहे. पण तिथे उच्च शिक्षणाची काही सोय नसल्यामुळे आपल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपल्या ओळखीच्या गावातून अनोळखी मोठ्या शहरात येण्यावाचून तिच्याकडे काहीही पर्याय उरत नाही. आणि यामध्ये सगळ्यात मोठा अडसर आहे तो म्हणजे तिच्या आईला ह्या गोष्टीसाठी मनवणे कारण तिच्या जाण्याला त्यांचा पूर्ण विरोध आहे. हुशार मोहक मटकर यात सरस्वतीची मुख्य भूमिका साकारत असून ती बारकाईने काम करणारी, आत्मविश्वास असलेली आणि स्वतंत्र अशी तरूण मुलगी आहे, जी आपल्या मूल्यांसोबत जोडलेली आहे. राजस्थानच्या एका गावातील सरस्वती कबड्डी चॅम्पियन असून तिचे जिल्हा आयुक्त बनण्याचे स्वप्न आहे. ती नीतिमान, धाडसी असली तरीही संवेदनशील आहे. जर कोणी काही कारणास्तव तिच्याकडे बोट दाखवले तर ती मागे हटत नाही, अढळ विश्वासाने प्रतिक्रिया देते आणि तिचे म्हणणे ऐकून घेतले जाईल याची खात्री करून घेते. आपल्या भूमिकेबद्दल प्रमुख नायिका मोहक मटकर उत्साहाने म्हणाली, हमारा परिवारसोबत गेले एक वर्षभर मी झी टीव्हीचा हिस्सा राहिलेली असून सरूसारख्या मालिकेसाठी प्रमुख भूमिका मिळाल्याबद्दल मी अतिशय उत्साहात आहे. जेव्हा मला ह्या मालिकेसाठी विचारण्यात आले तेव्हा तर मी अक्षरशः चंद्रावरच पोहोचले होते. हे माझ्यासाठी एक स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे.

# एचएमडीने संगीतावर केंद्रित वैशिष्ट्ये असलेले फोन लॉन्च केले, राजस्थान रॉयल्ससोबत भागीदारी पुढे वाढवली




**नवी दिल्ली, ४ एप्रिल :** ह्युमन मोबाईल डिव्हाईसने आज आपले नवीन फीचर फोन एचएमडी १३० म्युझिक आणि एचएमडी १५० म्युझिक लॉन्च केल्याची घोषणा केली. डेडिकेटेड म्युझिक कंट्रोल्स असलेले हे फोन संगीतप्रेमींसाठी डिझाईन करण्यात आले आहेत. या दोन्ही फोनवर ब्रँडकडून १ वर्षाची रिप्लेसमेंट गॅरंटी दिली गेली आहे. भारतीय बाजारपेठेत अतुलनीय किमतींमध्ये नाविन्यपूर्ण मोबाईल सोल्युशन्स उपलब्ध करवून देण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेमध्ये हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. एचएमडीचे व्हीपी आणि सीईओ - भारत आणि एपीएसी, रवी कुंवर यांच्यासह उत्पादनांच्या अनावरणाच्या प्रसंगी राजस्थान रॉयल्सचे डायरेक्टर ऑफ क्रिकेट कुमार संगकारा देखील उपस्थित होते. यावेळी झालेल्या चर्चेत मान्यवरांनी सहमती दर्शवली की, एचएमडीचे नावीन्य घडवून आणण्याबाबतचे सिद्धांत आणि रॉयल्सचा तंत्रज्ञानावर आधारित व सस्टेनेबिलिटीचे नेतृत्व करण्याचा दृष्टिकोन हे एकमेकांना मैदानावर आणि मैदानाबाहेर देखील अनुकूल आहेत.

लॉन्चप्रसंगी प्रतिक्रिया व्यक्त करताना, एचएमडी इंडिया आणि एपीएसीचे व्हीपी व सीईओ रवी कुंवर यांनी सांगितले, एचएमडीमध्ये आम्ही भारतीय ग्राहकांच्या विविध गरजा, आवडीनिवडी समजून घेतो. या देशात भरवशाची फीचर्स असलेल्या फोनपासून सर्वात नवीन स्मार्टफोन तंत्रज्ञानापर्यंत अनेक प्रकारच्या फोनची खूप मागणी आहे. एचएमडी १३० आणि एचएमडी १५० म्युझिकच्या लॉन्चसह, आम्ही टिकाऊ, दीर्घकाळपर्यंत चालणारे डिव्हाईस प्रस्तुत करण्याची वचनबद्धता कायम राखतो. पहिल्यांदाच स्मार्टफोन वापरत असलेल्या युजर्ससाठी हे फोन असाधारण मोबाईल अनुभव प्रदान करतील. त्याखेरीज आम्हाला खूप आनंद होत आहे की, आम्ही लवकरच आपले एन्ट्री-लेव्हल ५जी स्मार्टफोन आणत आहोत, जे अनेक प्रकारच्या युजर्सना हायस्पीड कनेक्टिविटीचे लाभ देतील.

भागीदारी पुढे वाढवली जाण्याबाबत राजस्थान रॉयल्सचे चीफ बिझनेस ऑफिसर आलोक चित्रे यांनी सांगितले, विश्वसनीय फीचर असलेले फोन हवे असणाऱ्यांपासून, स्मार्टफोन तंत्रज्ञानामध्ये सर्वात नवीन तंत्रज्ञान स्वीकारणाऱ्यांपर्यंत आम्ही भारतीय ग्राहकांच्या विविध आवश्यकता समजून घेऊ शकतो. एचएमडी १३० आणि एचएमडी १५० म्युझिक लॉन्चसोबत, आम्ही टिकाऊ, दीर्घकाळपर्यंत चालणारी डिव्हाईस प्रस्तुत करण्याची वचनबद्धता कायम राखत आहोत, पहिल्यांदाच स्मार्टफोन वापरत असलेल्यांसाठी हे फोन असाधारण मोबाईल अनुभव प्रदान करतील. याखेरीज आम्ही आमच्या पहिल्या एंट्री-लेव्हल ५जी स्मार्टफोनची घोषणा करताना खूप खुश आहोत, जे अनेक युजर्ससाठी हाय-स्पीड कनेक्टिविटी घेऊन येतील. आम्हाला गर्व आहे की, राजस्थान रॉयल्ससोबत भागीदारी आम्ही पुढे वाढवत आहोत, क्रिकेटप्रती आपल्या पॅशनमार्फत रॉयल्स भारतीय ग्राहकांसोबत आमचे नाते दृढ करतील. या यशस्वी भागीदारीची दुसरी इनिंग देखील यशस्वी ठरेल अशी आम्ही आशा करतो.

एचएमडी १३० आणि एचएमडी १५० म्युझिक फोन भारतातील प्रमुख रिटेल स्टोर्स, . आणि अनेक ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर अनुक्रमे १८९९ आणि २३९९ च्या किफायतशीर किमतींना उपलब्ध होतील.

## आज का अंदाज

शनिवार ५ एप्रिल २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| १२० | ७९० | ४७८ | २३५ | १३९ | ४०० | ३४० | ८०० |
| ३०० | ६०० | ३७९ | ४६० | ६७० | ७८९ | ५५७ | ३५० |
| ४९० | ५५६ | २७० | ३७० | ५८० | २४८ | ७०० | ५६७ |
| ३२ | ६२ | ९१ | ०१ | ३१ | ४१ | ७५ | ८५ |
| ३५ | ६५ | ९४ | ०४ | ३० | ४० | ७६ | ८६ |
| ३८ | ६८ | ९७ | ०७ | ३९ | ४९ | ७२ | ८२ |

५ एप्रिल : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ४९ | ५० | ८० |
| १७ | ४७ | ५३ | ८३ |
| १६ | ४६ | ५२ | ८२ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# मोटोरोला ने एज ६० फ्यूजन लाँच केला




**नवी दिल्ली, ४ एप्रिल :** मोबाइल तंत्रज्ञान आणि नवकल्पनेत जागतिक आघाडीवर असलेला तसेच भारतातील आघाडीचा एआय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या मोटोरोलाने आज आपल्या नव्या आणि बहुप्रतिक्षित एज ६० सिरीजमधील मोटोरोला एज ६० फ्यूजन हा पहिला स्मार्टफोन लाँच केला आहे. या नव्या सीरिजमधील प्राथमिक मॉडेल म्हणून हा फोन पूर्वीच्या लोकप्रियएज ५० फ्यूजन च्या जवळपास प्रत्येक बाबतीत खऱ्या अर्थाने अपग्रेड ठरतो. प्रीमियम डिझाइन आणि प्रगत वैशिष्ट्यांचा मिलाफ हव्या असलेल्या ग्राहकांसाठी हा फोन खास डिझाइन करण्यात आला आहे. शक्तिशाली एआय-आधारित अनुभवाच्या सहाय्याने मोटोरोला एज ६० फ्यूजन वापरकर्त्या अधिक सुलभ आणि स्मार्ट अनुभव मिळतो. जगातील सर्वात इमर्सिव्ह १.५के ऑल ४ साइड्स कर्व्हड डिस्प्ले, पँटोन मान्यताप्राप्त ट्रू कलर* टेक्नोलॉजी, जगातील पहिली आणि सेगमेंटमधील सर्वोत्तम १००% ट्रू कलर सोनी एलवाईटी ७०० सी कॅमेरा सिस्टीम आणि प्रगत एआय फीचर्ससह शानदार इमेजिंग अनुभव ही या स्मार्टफोनची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. यात मोटो एआईच्या सहाय्याने जनरेटिव्ह एआय, कॅमेरा आणि असिस्ट फिचर्सचा समावेश करण्यात आला आहे, जे सेगमेंटमधील सर्वोत्तम एआय अनुभव देतात. याशिवाय, या स्मार्टफोनमध्ये आईपी६८ आणि आईपी ६९ अंडरवॉटर प्रोटेक्शनसह खऱ्या अर्थाने एमआईएल-८१०एच मिलिटरी ग्रेड प्रमाणपत्र प्राप्त संरक्षण आहे. तीन वेगवेगळ्या पॅन्टोनने निवडलेल्या जबरदस्त रंगांमध्ये आणि प्रीमियम व्हेगन लेदर फिनिशसह हा फोन उपलब्ध आहे.

कॅमेरा परफॉर्मन्सचा विचार करता मोटोरोला एज ६० फ्यूजनमध्ये जगातील पहिला आणि सेगमेंटमधील सर्वोत्तम १००% ट्रू कलर सोनी लिटिया ७००सी कॅमेरा देण्यात आला आहे, ज्याचे रंग पॅन्टोन मान्यताप्राप्त आहेत. या कॅमेऱ्याने पँटोनचे मूल्यांकन आणि श्रेणीकरण निकष पूर्ण केले असून, वास्तवातील पॅनटॅन रंगसंगती अत्यंत अचूकतेने टिपण्यात येते. पॅनटॅन स्किनटोन कालावधी असल्यामुळे हा कॅमेरा मानवी त्वचेच्या विविध छटांचा परिणामकारकतेने दाखवतो. प्रत्येक फोटोमध्ये आणि व्हिडिओमध्ये उत्कृष्ट दर्जा हवा असणाऱ्यांसाठी डिझाइन करण्यात आलेल्या या ५०एमपी कॅमेरा सिस्टिममध्ये सोनी लिटिया ७००सी सेन्सर वापरण्यात आला आहे, जो अत्यंत कमी प्रकाशातसुद्धा जबरदस्त कामगिरी करतो. ऑल-पिक्सेल फोकस टेक्नॉलॉजीमुळे यात पारंपरिक कॅमेऱ्यांपेक्षा ३२ पट अधिक फोकसिंग पिक्सेल्स आहेत, जे दिवसा आणि रात्रीही अधिक वेगवान आणि अचूक फोकस प्रदान करतात. यासोबतच यात ओआयएस म्हणजेच ऑप्टिकल इमेज स्टॅबिलायझेशन आहे, जे चित्र किंवा व्हिडिओमध्ये अनावश्यक हालचालीमुळे होणारा ब्लर (धुसरपणा) आपोआप कमी करते. त्यामुळे एक्स्पोजरसाठी वेळ लागला तरी स्पष्टता आणि बारकावे कायम राहतात. कॅमेरा सिस्टीममधील दुसरा रिअर कॅमेरा हा १३एमपी अल्ट्रावाईड सेन्सर आहे, ज्यामध्ये १२० अंशांचे व्ह्यू फील्ड मिळते. मोटोएआई द्वारे हा कॅमेरा अधिक सक्षम करण्यात आला आहे, जो प्रत्येक शॉटमध्ये नैसर्गिक स्पष्टता आणि बारकावे दाखवतो आणि कमी प्रकाशातील क्षणही परफेक्ट कॅप्चर करतो. यामधील अल्ट्रावाईड लेन्समध्ये इन-बिल्ट मॅक्रो व्हिजन आहे, ज्यामुळे वापरकर्ते केवळ ३.५ सेमी अंतरावरून अत्यंत जवळचे क्लोजअप्स सहज टिपू शकतात.

फ्रंट कॅमेऱ्याचा विचार करता, वापरकर्ते ३२एमपी सेल्फी कॅमेऱ्यातून उच्च रिझोल्यूशनमध्ये सुंदर सेल्फीज काढू शकतात किंवा थक्क करणारे ४के व्हिडिओ शूट करू शकतात. या कॅमेऱ्यात क्वाड पिक्सेलटेक्नॉलॉजी आहे, जी चार पिक्सेल्स एकत्र करून चौपट अधिक लो-लाइट सेन्सिटिव्हिटी मिळवते आणि प्रत्येक शॉट अधिक प्रकाशमान व प्रभावी बनवते. शॉट घेण्यापूर्वी, ३-इन-१ ॲम्बियंट सेन्सर रिअल टाइम लाइट डिटेक्शन टेक्नोलॉजीच्या मदतीने सभोवतालचा प्रकाश समजून घेतो आणि त्यानुसार कॅमेराची लाईट सेन्सिटिव्हिटी आपोआप समायोजित करतो, ज्यामुळे योग्य एक्स्पोजर, अचूक रंग आणि त्रासदायक फ्लिकर होत नाही.

## राशीभविष्य

**मेष :** कोर्टाच्या कामात आज अजिबात गाफील राहू नका. अन्यथा तुम्ही अडचणीत येऊ शकता. तुमच्या कृती योजना गुप्तपणे अंमलात आणा. मित्रांकडून सहकार्य मिळेल. कामाच्या ठिकाणी समस्या कमी होतील.

**वृषभ :** आज प्रेम त्यामुळे विश्वास कमी होऊ शकतो. प्रेमसंबंधात अडकलेल्या लोकांनी आपल्या रागावर नियंत्रण ठेवावे. कोणत्याही गंभीर आजाराने त्रस्त लोकांचे आरोग्य झपाट्याने सुधारेल.

**मिथुन :** करिअरमध्ये चांगली संधी मिळेल. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. कौटुंबिक खर्चात वाढ होईल. नवीन वाहन खरेदीची योजना यशस्वी होवो प्रेमसंबंधांमध्ये अडचणी वाढू शकतात.

**कर्क :** आज आरोग्याशी संबंधित काही विशेष समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. तब्येत अधिक सुधारण्यासाठी, योगासने, व्यायाम इत्यादींमध्ये रस वाढवा. आजचा दिवस काही त्रासाचा असेल.

**सिंह :** काही अप्रिय लोकांसोबत भेट होईल. यामुळे तुम्हाला अनावश्यक त्रास होईल. वडिलांच्या आशीर्वादाने कृपेने मौल्यवान वस्तू किंवा मालमत्ता मिळू शकते. तुमचा आत्मविश्वास वाढेल.

**कन्या :** वरिष्ठ सहकाजयांकडून आनंद आणि सहकार्य वाढेल. नोकरीच्या शोधात तुम्हाला घरापासून दूर जावे लागेल. आयात निर्यात विदेशी सेवा कार्यात गुंतलेल्या लोकांना सरकारकडून विशेष सहकार्य मिळेल.

**तुळ :** प्रिय लोकांची भेट होईल. आजचा दिवस समाधानकारक असेल. राजकीय क्षेत्रात प्रगती होईल. आज एखादी गुडन्यूज मिळेल. यामुळे पद आणि प्रतिष्ठेत वाढ होईल.

**वृश्चिक :** तुमचे विचार योग्य पद्धतीने इतरांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करा. प्रेमसंबंधातील दुरावा संपेल. विवाहाशी संबंधित कामात प्रगती होईल. ज्यामुळे तुम्हाला खूप आनंद होईल.

**धनु :** पोटाशी संबंधित काही समस्या जास्त खाण्या-पिण्यामुळे असू शकतात. तुमचा दिवस खूप व्यस्त असेल. अनावश्यक खर्चापासून दूर राहा. गाडी चालवताना सावधगिरी बाळगा.

**मकर :** तुम्हाला लांबचा प्रवास करावा लागू शकतो. आजचा दिवस तुमच्यासाठी प्रगतीचा दिवस असेल. महत्त्वाच्या कामात यश मिळेल. तुमचे प्रत्येक काम हुशारीने करा.

**कुंभ :** आजचा दिवस कुंभ राशीच्या व्यक्तींसाठी कामात बदल होणारा असेले. ऑफिसमध्ये वरिष्ठ तुमची प्रशंसा करतील. आज इतरांसाठी धावपळ कराल. व्यवसायात पैशाशी संबंधित तुमच्या सर्व योजना यशस्वी होतील.

**मीन :** सामाजिक कार्यात अधिक सहभाग घेतल्याने तुमचा सामाजिक दर्जा वाढेल. लांबचा प्रवास होईल किंवा तुम्ही परदेशी सहलीलाही जाऊ शकता. आजचा दिवस. हसत-खेळत जाईल.

# धर्मादाय रुग्णालयांचा ढोंगीपणा : दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील ताजा प्रसंग



दिपक कैतके
मुंबई

धर्मादाय रुग्णालये ही समाजातील गरीब, निर्धन आणि अल्प उत्पन्न गटातील लोकांसाठी आशेचा किरण मानली जातात. सरकारकडून या रुग्णालयांना विविध सवलती आणि सुविधा दिल्या जातात, ज्यामुळे त्यांना कमी खर्चात सेवा पुरवणे शक्य होते. या सवलतींचा उद्देश असतो की, समाजातील वंचित घटकांना सवलतीच्या दरात किंवा मोफत उपचार मिळावेत. परंतु, पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात नुकत्याच घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने या धर्मादाय रुग्णालयांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या घटनेने हे स्पष्ट केले आहे की, अनेक धर्मादाय रुग्णालये केवळ नावापुरतीच धर्मादाय आहेत, प्रत्यक्षात ते नफेखोरीच्या मार्गावर चालत आहेत.

### तनिषा भिसे यांचा दुर्दैवी मृत्यू

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तनिषा भिसे या तरुण मातेचा मृत्यू झाला, आणि त्याचे कारण होते रुग्णालय प्रशासनाची असंवेदनशीलता आणि पैशांची मागणी. तनिषा यांना प्रसूती वेदनांनी त्रस्त असताना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांचे पती सुशांत भिसे हे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक आहेत. असे असूनही, रुग्णालयाने उपचार सुरू करण्यापूर्वी दहा लाख रुपये अनामत रक्कम भरण्याची अट घातली. तनिषा यांच्या नातेवाईकांनी अडीच लाख रुपये तात्काळ जमा केले आणि उर्वरित रक्कम लवकर भरण्याची तयारी दर्शवली, तरीही रुग्णालयाने उपचार देण्यास नकार दिला. शेवटी तनिषा यांना दुसऱ्या रुग्णालयात हलवावे लागले, जिथे त्यांनी दोन जुळ्या बाळांना जन्म दिला, पण प्रसवोत्तर गुंतागुंतीमुळे त्यांचा मृत्यू झाला. वैद्यकीय सूत्रांचे म्हणणे आहे की, जर वेळेत उपचार मिळाले असते, तर ही घटना टळू शकली असती.

### धर्मादाय रुग्णालयांचा उद्देश काय?

धर्मादाय रुग्णालये ही शासनाच्या विशेष योजनेअंतर्गत कार्यरत असतात. या योजनेचा मुख्य उद्देश आहे की, निर्धन आणि अल्प उत्पन्न गटातील रुग्णांना सवलतीच्या दरात किंवा मोफत उपचार मिळावेत. सरकार या रुग्णालयांना नाममात्र दरात जमिनी, विजेच्या आणि पाण्याच्या बिलांमध्ये सवलती, करात सूट आणि इतर अनेक सुविधा पुरवते. या सवलतींच्या बदल्यात रुग्णालयांना त्यांच्या उत्पन्नाचा ठराविक हिस्सा गरीब रुग्णांच्या उपचारांसाठी खर्च करणे बंधनकारक असते. परंतु, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या या घटनेने हे दाखवून दिले आहे की, अनेक रुग्णालये या जबाबदारीकडे पाठ फिरवतात आणि केवळ नफ्यावर लक्ष केंद्रित करतात.

### शासनाच्या सवलतींचा गैरवापर

धर्मादाय रुग्णालयांना मिळणाऱ्या सवलतींचा वापर हा गरीब रुग्णांच्या कल्याणासाठी व्हायला हवा. परंतु, अनेक रुग्णालये या सवलतींचा फायदा घेऊन आपली आर्थिक बाजू मजबूत करतात आणि मूळ उद्देशाला हरताळ फासतात. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय हे याचे ज्वलंत उदाहरण आहे. दहा लाख रुपये अनामत रक्कमेची मागणी करणे हे दर्शवते की, रुग्णालयाला रुग्णाच्या जिवापेक्षा पैशांची अधिक चिंता आहे. जर सत्ताधारी आमदाराच्या स्वीय सहाय्यकाच्या पत्नीची अशी अवस्था होऊ शकते, तर सामान्य माणसाची काय परिस्थिती असेल, याचा विचारच न केलेला बरा.

धर्मादाय रुग्णालयांचा हा ढोंगीपणा समाजातील गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांसाठी मोठी समस्या बनत आहे. ज्या रुग्णालयांवर त्यांनी आपल्या आरोग्याची भिस्त ठेवली आहे, तिथेच त्यांना उपचाराऐवजी अपमान आणि असहायता पदरी पडते. तनिषा भिसे यांच्या मृत्यूने या समस्येचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे. गरीब रुग्णांना उपचार नाकारले गेले, तर ते कुठे जाणार? खाजगी रुग्णालयांचे दर सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर असतात, आणि सरकारी रुग्णालयांमध्ये सुविधांचा अभाव असतो. अशा परिस्थितीत धर्मादाय रुग्णालये हीच त्यांची एकमेव आशा असते, पण तिथेही जर पैशांचीच भाषा बोलली जाणार असेल, तर ही व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे हे लक्षण आहे.

### शासनाची भूमिका आणि जबाबदारी

या प्रकरणावरून शासनाच्या प्रभावावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मंत्रालयातून फोन गेल्यानंतरही दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने आपली भूमिका बदलली नाही, हे धक्कादायक आहे. राज्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासह वैद्यकीय कक्ष असताना अशा घटना घडत असतील, तर शासनाचा धाक आणि नियंत्रण किती कमकुवत आहे, हे स्पष्ट होते. या रुग्णालयांवर कठोर कारवाई करणे आणि त्यांच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच, धर्मादाय रुग्णालयांनी गरीब रुग्णांसाठी ठराविक जागा राखीव ठेवाव्यात आणि त्यांना मोफत किंवा सवलतीच्या दरात उपचार द्यावेत, हे काटेकोरपणे लागू करणे आवश्यक आहे.

या घटनेनंतर समाजातून संतापाची लाट उसळली आहे. माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी या रुग्णालयावर कठोर कारवाईची मागणी केली आहे, तर सुषमा अंधारे यांनी सामान्य माणसाच्या दुर्दशेकडे लक्ष वेधले आहे. जनतेची मागणी आहे की, अशा रुग्णालयांचा ताबा सरकारने घ्यावा आणि त्यांना खऱ्या अर्थाने धर्मादाय रुग्णालय म्हणून कार्य करण्यास भाग पाडावे. तसेच, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर कायदा आणि नियमांची अंमलबजावणी व्हावी.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील तनिषा भिसे यांच्या मृत्यूची घटना ही केवळ एका व्यक्तीचा मृत्यू नाही, तर संपूर्ण आरोग्य यंत्रणेच्या अपयशाचे आणि धर्मादाय रुग्णालयांच्या ढोंगीपणाचे प्रतीक आहे. सरकारने या रुग्णालयांना सवलती देऊन त्यांच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे आणि गरीब रुग्णांना न्याय मिळवून द्यावा. जर धर्मादाय रुग्णालये आपली जबाबदारी पार पाडत नसतील, तर त्यांचा हा दर्जा काढून घेण्याची वेळ आली आहे. तनिषा यांच्या मृत्यूने समाजाला जागे केले आहे, आता सरकारनेही जागे होऊन ठोस पावले उचलण्याची गरज आहे. नाहीतर, सामान्य माणसाच्या जिवाची किंमत अशीच स्वस्त राहील आणि आरोग्य यंत्रणा केवळ नावापुरतीच उरेल.




# एका सुंदर बेटावर...

वसुंधरा

मित्रांनो, 'रियुनियन आईसलँड' हे हिंदी महासागरातलं एक बेट असून ते फ्रान्सच्या ताब्यात आहे. त्यामुळे हा फ्रान्सचाच भाग समजला जातो. हे बेट मॉरिशसपासून २०० किलोमीटर अंतरावर आहे. या बेटाच्या पश्चिमेला मादागास्कर हा देश आहे. पूर्वीच्या काळी हे बेट 'बॉरबॉन' या नावाने ओळखलं जायचं. 'युरोपियन युनियन'चा घटक असल्यामुळे या बेटावर युरो हे चलन वापरलं जातं. हे बेट खूप सुंदर आहे. उंच पर्वतरांगा हे इथलं वैशिष्ट्य. या बेटावर जागृत ज्वालामुखीही आहे.

पोर्तुगिजांनी सोळाव्या शतकात या बेटांचा शोध लावला. 'सेंट डेनिस' ही रियुनियन आईसलँडची राजधानी. १६४३ मध्ये फ्रान्सने या बेटावर ताबा मिळवला आणि 'बॉरबॉन' हे नाव दिलं. १६६२ मध्ये फ्रेंच लोकांनी या बेटावर वसाहती स्थापन केल्या. १७९३ पासून हा भाग 'रियुनियन आईसलँड'



या नावाने ओळखला जाऊ लागला. १८१० ते १८१५ या काळात या बेटावर ब्रिटिशांचं राज्य होतं. मात्र त्यानंतर त्यावर फ्रान्सने ताबा मिळवला.

हा देश साखर, व्हॅनिला आणि मासे यांची निर्यात करतो. मॉरिशसमधून दक्षिण आफ्रिकेत जाणाऱ्या बोटी, जहाजं या बेटावर थांबतात. फ्रेंच ही इथली अधिकृत भाषा आहे. मात्र इथले लोक 'रियुनियन क्रेओले' ही भाषा बोलतात. या बेटांवर विविध संस्कृतींचे लोक रहातात. इथल्या काही बेटांवर काळी वाळू आढळते. काळ्या वाळूचे समुद्रकिनारे हे सुद्धा या देशातलं आकर्षण आहे. या देशात विविध प्रजातींचे पक्षी आढळतात. रियुनियन आईसलँडमध्ये सर्वात प्रथम युरो हे चलन वापरण्यात आलं.

# असा असू दे सुट्टीतला दिवस

नियोजन

सुट्टी लागली की दिवसभरातील बराच काळ निवांत मिळतो. पण मग करण्यासारखे काही नाही, असे वाटून तुम्ही लवकरच कंटाळता. पण हा कंटाळा टाळायचा असेल तर आत्तापासूनच दिवसभराच्या वेळेचे मस्त नियोजन करा. यामुळे तुम्ही सुट्टीचा छान विनियोग करु शकाल तसेच आनंदी व शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्रिय राहून सुट्टीची मजा लुटू शकाल.



यासाठी सकाळी उठल्यावर थोडा व्यायाम करा किंवा ताज्या हवेत खेळायला जा. सुट्टी आहे म्हणून बराच काळ झोपून राहणे टाळा. त्यामुळे तुमची ऊर्जा वाढेल. त्यानंतर हलका नाश्ता करा. नंतरचा वेळ तुम्ही अवांतर वाचनासाठी राखून ठेवू शकता. यामुळे ज्ञानामध्ये मोठे भर पडणे शक्य होईल. त्यानंतर तुम्ही काही शैक्षणिक खेळही खेळू शकता. यामुळेही तुमचे ज्ञान आणि आकलन वाढेल.

सुट्टीच्या काळातील दुपार मुक्त खेळण्याची ठेवा. यावेळी तुम्ही बैठे खेळ खेळू शकता. यामुळे तुमची शारीरिक, मानसिक वाढही छान होईल. खेळण्यापूर्वी छान पौष्टिक जेवण करायला अजिबात विसरु नका. संध्याकाळी तुम्ही आवडत्या कलावर्गाला जाऊ शकता. हस्तकला किंवा गेम्समध्ये रुची असेल तर आता ते शिकण्याची संधी साधू शकता. यामुळेही तुमच्या ज्ञान आणि कौशल्यात मोठी वाढ होईल. सुट्टीत बाहेर फिरायला किंवा एखाद्या लहान सफरीला अवश्य जा कारण यामुळे तुम्हाला नवनवीन अनुभव मिळतात.

# क्रिकेटविषयी सगळे काही

वाचा तर खरं

मुलांनो, तुम्हाला क्रिकेट आवडतं का? आपल्याला क्रिकेटची सगळी माहिती असावी, असं तुम्हाला वाटत असेल. स्कोअर काय झाला, संघात कोणते खेळाडू आहेत, भारतीय संघाच्या दौऱ्यांचं वेळापत्रक या सगळ्याची माहिती देणारी बरीच अ‍ॅप्स आहेत. ही अ‍ॅप्स गुगल प्ले स्टोअरमधून डाउनलोड करता येतील. अशा काही अ‍ॅप्सविषयी...




✽ 'लाईव्ह लाईन अँड क्रिकेट स्कोर्स'हे अ‍ॅप 'क्रिकेट एक्स्चेंज'ने विकसित केलं आहे. या अ‍ॅपमध्ये क्रिकेट संघांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला आहे. तसंच प्रत्येक सामन्याची माहिती तुम्हाला मिळू शकेल. यासोबतच क्रिकेटशी संबंधित बातम्याही तुम्ही वाचू शकता. म्हणजेच क्रिकेटची सगळी माहिती फक्त एका क्लिकवर मिळू शकेल.

✽ 'क्रिकेट लाईन गुरू'वर वाऱ्याच्या वेगाने स्कोअर कळू शकेल. इतकंच नाही तर तज्ज्ञांचे लेख इथे वाचू शकता. माजी क्रिकेटपटूंची मतं जाणून घेता येतील.

✽ क्रिकेट स्पर्धेशी संबंधित बातम्या, सामन्यांचं वेळापत्रक, फोटो, व्हिडिओ बघण्यासाठी 'क्रिकेट नेक्स्ट' अ‍ॅप डाउनलोड करून घ्या. इथे क्रिकेट तज्ज्ञांचे ब्लॉग्जही वाचायला मिळतील. अ‍ॅनॅलिसिस विभागात तुम्ही तुमची मतंही मांडू शकता.

✽ 'क्रिकबझ' या अ‍ॅपवरही तुम्हाला रंजक माहिती मिळू शकते. तज्ज्ञांची मतं जाणून घेता येईल. सामन्याबद्दलची सगळी माहिती इथे जाणून घेता येईल.

✽ 'बीसीसीआय' नावाच्या अ‍ॅपवरही विविध फीचर्स आहेत.

तुम्ही तुमच्या आवडीचं अ‍ॅप डाउनलोड करून घेऊ शकता.

# अतिथंड पाणी का नको?

माहिती असावे

मुलांनो, उन्हाळ्यात खूप तहान लागते ना? पण बाहेरुन आल्यावर वा दिवसभर तुम्ही फ्रिजमधील पाणी पिता का? तसे करत असाल तर याचे धोके नक्की लक्षात घ्या.



**पचनसंस्थेवर होणारा परिणाम:**

फ्रिजमधील पाणी खूप थंड असते तर शरीराचे तापमान गरम असते. असे असताना जास्त थंड पाणी प्यायल्यानंतर पोटात गोळा येऊ शकतो. यामुळेच पचन प्रक्रियेतही अडथळा येतो. थंड पाणी प्यायल्यामुळे पचनसंस्थेतील रक्तवाहिन्या संकुचित होतात. त्यामुळेही पचनाची प्रक्रिया मंदावते आणि अजीर्ण, मळमळ, गॅसेस होणे, पोटदुखी यासारख्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**पाणी दूषित होण्याचा धोका:**

फ्रिजमध्ये पाणी ठेवल्यास ते दूषित होऊ शकते. फ्रिजच्या आतल्या तापमानामुळे त्यात बॅक्टेरिया आणि इतर सूक्ष्मजीवांची वाढ होऊ शकते. फ्रिज स्वच्छ नसेल किंवा पाणी फार काळ ठेवलं असेल तरीही त्यात बॅक्टेरिया, बुरशी आणि इतर सूक्ष्मजीवांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे असे पाणी प्यायल्यानंतर पोटाच्या विकारांची शक्यता वाढते.

**थंड पाणी प्यायल्यामुळे शरीरावर होणारे प्रभाव:**

थंड पाणी प्यायल्यामुळे शरीराच्या तापमानात अचानक फरक पडतो. विशेषतः उन्हाळ्यात शरीर आधीच उष्ण असते. असे असताना थंड पाणी शरीराला शॉक देऊ शकते. यामुळे गिळण्याची समस्या, श्वासोच्छ्वासाशी संबंधित समस्या किंवा फुफ्फुसांच्या इन्फेक्शनची जोखीम वाढू शकते.

**प्रतिरोधक शक्तीवर परिणाम:**

अत्यंत थंड पाणी प्यायल्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. यामुळे विविध प्रकारच्या इन्फेक्शनचा धोका वाढतो.

**गॅस्ट्रिक समस्यांचे वाढीव धोके:**

थंड पाणी पिणे गॅस्ट्रिक समस्या निर्माण करू शकते. त्याचबरोबर घसा दुखणे, सर्दी, खोकला हे त्रासही होतात. म्हणूनच उन्हाळ्यात फ्रिजमधील पाणी पिऊ नका. त्याऐवजी माठातील थंड पाणी प्या. बाहेरुन आल्यानंतर पाणी पिण्यापूर्वी गुळाचा खडा खा. यामुळे उष्णतेचा त्रास होत नाही. महत्त्वाचे म्हणजे पिण्यासाठी स्वच्छ आणि ताज्या पाण्याचा वापर करा. कुठेही पाणी प्याल तर आजारी पडाल.

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) प्रसिद्ध गावळकोंडा किल्ला कोणत्या राज्यात आहे?
२) ऑकलंड हे शहर कोणत्या देशात आहे?
३) दूधसागर धबधबा कोणत्या राज्यात आहे?
४) 'व्हॅली ऑफ किंग्ज' कोणत्या देशात आहे?
५) साहित्य अकादमीचं मुख्यालय कुठे आहे?
६) 'मोहिनीअट्टम' हा कोणत्या राज्यातला नृत्यप्रकार आहे?
७) 'हॉर्नबिल फेस्टिवल'चं आयोजन कोणत्या राज्यात केलं जातं?
८) कोणार्कचं सूर्यमंदिर कोणत्या राज्यात आहे?
९) रेल्वे इंजिनचा शोध कोणी लावला?
१०) फाउंटन पेनचा शोध कोणी लावला?


उत्तरं : १) तेलंगणा २) न्यूझीलंड ३) गोवा ४) इजिप्त ५) नवी दिल्ली ६) केरळ ७) नागालँड ८) ओडिशा ९) जॉर्ज स्टीफन्सन १०) लुईस वॉटरमन



# असे आहे 'वनतारा'

रोचक

छोट्या दोस्तांनो, अलिकडे तुम्ही 'वनतारा' या अभयारण्याविषयी वाचत वा ऐकत असाल. हे गुजरात राज्यातील जामनगर जिल्ह्यात स्थित असून ते अंबानी कुटुंबाकडून संरक्षण करण्यात आले आहे. या अभयारण्यात प्रामुख्याने वाघ, सिंह, हरीण, नीलगाय यासारखे बरेच वन्यप्राणी आढळतात. हे अभयारण्य जैवविविधतेने समृद्ध असून इथे विविध प्रकारची झाडे आणि वनस्पती आढळतात. अंबानी कुटुंबाच्या वतीने या अभयारण्याच्या विकासावर विशेष लक्ष दिले गेले आहे. या अभयारण्याचे मुख्य उद्दिष्ट वन्यजीवांचे संरक्षण आणि त्यांचा नैसर्गिक अधिवास टिकवून ठेवणे हे आहे. या ठिकाणी पर्यावरणीय शिक्षण, संशोधन आणि संवर्धन कार्यासाठी विविध प्रकल्प राबवले जातात. अभयारण्यातील वन्यजीव आणि पर्यावरणाची स्थिती उत्तम ठेवण्यासाठी या ठिकाणी नियमितपणे पाणी पुरवठा, वेगवेगळ्या जातीच्या गवताची लागवड आणि इतर उपक्रम राबवले जातात. सध्या हे अभयारण्य पर्यावरण आणि वन्यजीव प्रेमींना आकर्षित करत आहे. इथे वन्यप्राण्यांची व्यवस्थापन प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक आणि योजनाबद्ध पद्धतीने केली जाते. यासाठी काही महत्त्वाचे टप्पे आणि धोरणे लागू केली जातात. जसे की, वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी इथे योग्य उपाय योजना राबवल्या जातात. वन्यप्राण्यांच्या जीवनासाठी हानीकारक ठरणारे सर्व घटक दूर करण्यावर इथे भर दिला जातो. त्याचबरोबरच वन्यप्राण्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पुरेसे अन्न, पाणी आणि सुरक्षित आश्रय मिळावा याचीही इथे काळजी घेतली जाते. पर्यावरणीय समतोल राखण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी जंगलात झाडांची लागवड, पाणीस्त्रोतांचे संरक्षण आणि गवताच्या क्षेत्रांचा विकास इथे करण्यात येतो. नियंत्रित शिकार आणि मानव-प्राणी संघर्ष कमी करणे: शिकार रोखण्यासाठी आणि मनुष्य-प्राणी संघर्ष टाळण्यासाठी कठोर नियम आणि कायदे लागू केले जातात. वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी प्रादेशिक पातळीवर पॅट्रोलिंग आणि निरीक्षण केले जाते. इथे आजारी, जखमी वा उपचारांची आवश्यकता असलेल्या प्राण्यांवर आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रगत प्रणालींद्वारे, मशिनद्वारे उपचार केले जातात. त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर, त्यांची देखभाल करणारे अशी मोठी टीम इथे काम करते.




# आत्मसात करा ही कौशल्ये

काय शिकणार?

छोट्या दोस्तांनो, वर्षभर तुम्ही वेगवेगळे विषय शिकता. हळूहळू त्यात रुची वाढत जाते आणि मग त्यातील एखाद्या विषयात तुम्ही पारंगत होता. हे करताना सध्याच्या काळात काही महत्त्वाची कौशल्ये शिकणे गरजेचे असल्याचे लक्षात घ्या. चला तर मग, आज कशाच काही कौशल्यांविषयी जाणून घेऊ या.




**तंत्रज्ञान आणि डिजिटल कौशल्ये:** आजच्या डिजिटल युगात तुम्हाला तंत्रज्ञानाची समज असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच तुम्ही संगणक, इंटरनेट, प्रोग्रॅमिंग आणि कोडिंगविषयी अधिकाधिक जाणून घेत शिकले पाहिजे. यामुळे तुम्हाला शिकण्यास मदत होईलच खेरीज माहिती शोधणे, ऑनलाइन संसाधनांचा उपयोग करणे आणि भविष्यकालीन करिअरमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करणे या सगळ्यात मोठी मदत होईल. म्हणजेच शालेय अभ्यासाबरोबरच डिजिटल साक्षरतेचे महत्त्व आणि ऑनलाइन सुरक्षितता कसे राखावे हे शिकून घेणेही अतिशय आवश्यक आहे.

**सर्जनशीलता आणि कला:** मुलांनो, आपल्यातील सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याकडे लक्ष ठेवा. त्यासाठी चित्रकला, संगीत, नृत्य, लेखन यासारख्या कलाशाखांविषयी जाणून घ्या. यामुळे बुद्धिमत्तेचे आणि कल्पकतेचे वर्धन होतेच शिवाय शालेय काम आणि इतर गोष्टी करत असतानाच मनोबळ आणि आत्मविश्वास देखील वाढतो. इतरांशी संवाद साधण्याचे कौशल्य: तुमच्याकडे इतरांशी संवाद साधण्याची कला साध्य असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळेच तुम्ही आपले विचार कसे व्यक्त करावेत, इतरांचे बोलणे कसे ऐकावे, त्यातून काय घ्यावे आणि काय टाळावे हे शिकायला हवे. यामुळे तुमची संवेदनशीलता आणि सामाजिक समज वाढते. सहकार्य, गट कार्य आणि मित्रत्व यांचे महत्त्वदेखील याच शिकण्यातून प्राप्त होते.

**समस्या सोडवण्याची क्षमता:** आपल्याला अनेक छोट्यामोठ्या समस्या भेडसावत असतात. अडचणींचे अनेक प्रसंग येतात. अशावेळी त्या समजून, विचारपूर्वक निर्णय घेत प्रश्न सोडवणे गरजेचे असते. म्हणूनच तर्कशक्ती विकसित करणे हादेखील कौशल्यविकासातील एक महत्त्वाचा भाग आहे, हे लक्षात घ्या.

**शारीरिक आणि मानसिक आरोग्य:** सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुमच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणेही शिका. कारण ही बाब तर अत्यंत महत्त्वाची आहे. योग्य आहार, नियमित व्यायाम आणि पुरेशी विश्रांती याबद्दल तुमच्या मनात जागरुकता निर्माण झाली की बरेच काम सोपे होईल. मानसिक ताण कमी करण्यासाठी तुम्ही योग, ध्यान आणि श्वासाची तंत्रेही शिकू शकता.

ठिपके जुळवा



## वन्यजीव

### वाघोबाच्या विश्वात

छोट्यांनो, वाघाच्याही अनेक प्रजाती आहेत. भारतात 'रॉयल बंगाल टायगर' आढळतो. यासोबतच 'इंडो-चायनीज टायगर', 'साउथ-चायना टायगर', 'सुमात्रन टायगर', 'सायबेरियन टायगर', 'मलयन टायगर' या प्रजातींचे वाघही आहेत. सुमात्रन प्रजातीचे वाघ इंडोनेशियातल्या सुमात्रा बेटावर आढळतात.



मलेशियात मलयन टायगर आढळतात. या वाघांना एकटं रहायला आवडतं. सायबेरियन प्रजातीच्या वाघांचं अस्तित्व उत्तर कोरिया, उत्तर चीन, मंगोलिया आणि रशिया या देशांमध्ये आहे.

## खादाडी

### असा होईल इडली पिझ्झा

मुलांनो, उरलेल्या इडलीचा वापर करून मस्त पिझ्झा बनवता येईल. यासाठी चार इडल्या, २ मोठे चमचे पिझ्झा सॉस, तीन चमचे किसलेलं चीझ, बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो आणि सिमला मिरची, एक चमचा चिली फ्लेक्स आणि मीठ हे साहित्य घ्या. पहिल्यांदा सगळ्या इडल्यांना एका बाजूने पिझ्झा सॉस लावून घ्या. त्यावर भाज्या घाला. मग चवीनुसार मीठ घाला. त्यावर किसलेलं चीझ आणि चिली फ्लेक्स घाला. आता तव्यावर थोडं तेल घालून त्यावर इडल्या ठेवा. चीझ वितळल्यावर गॅस बंद करा. गरमागरम इडली पिझ्झा सॉससोबत खा.



## स्टडी टिप्स

### स्मार्टफोन ठेवा बाजूला


मुलांनो, स्मार्टफोन जवळ बाळगणं, टीव्हीसमोर बसून अभ्यास करणं यामुळे तुमचं मन एकाग्र होणार नाही. त्यामुळे कोणतेही काम करताना स्मार्टफोन लांब ठेवा. टीव्ही बंद करा. यामुळे तुमचं सगळं लक्ष फक्त कामावरच केंद्रित होईल आणि समोरच्या गोष्टी नीट लक्षात राहतील.



## योगा टाईम

### रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी...

रोगप्रतिकारशक्ती कमी असेल तर सर्दी, खोकला, ताप असे विकार वारंवार त्रास देतात. तुम्हीही सारखे आजारी पडत असाल तर काही योगासनं करता येतील. भुजंगासन, धनुरासन, सेतूबंधासन अशा आसनांमुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. फुफ्फुस बळकट होतं. तुम्ही मुलं बसून अभ्यास करता. सतत बसून राहिल्याने शरीराला त्रास होतो. अशावेळी भुजंगासनामुळे आराम मिळतो.



# विहिरीत ट्रॅक्टर कोसळून ८ महिलांचा मृत्यू





■ **वृत्तसंस्था, नांदेड, दि. ४ :** महिला मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळला. या घटनेत ८ महिलांचा मृत्यू झाला आहे. नांदेडच्या आलेगाव शिवारात हा अपघात आज सकाळी ७ वाजता घडला. या महिला हळद काढणीच्या कामासाठी जात होत्या.

गुंज गावातील महिला हळद काढणीच्या कामासाठी जात असताना ट्रॅक्टरच्या चालकाला अंदाज न आल्याने हा अपघात घडला. पोलिसांसह स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले.

वसमत तालुक्यातील गुंज येथील १० महिला व एक पुरुष दगडू शिंदे यांच्या शेतात हळद काढणीच्या कामासाठी निघाल्या होत्या. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर विहिरीत कोसळला. यातील २ महिला आणि १ पुरुष बचावले. विहिरीमध्ये पाणी आणि गाळ असल्यामुळे ट्रॅक्टर पूर्णपणे पाण्यात बुडाला. या घटनेमुळे गुंज गावावर शोककळा पसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. ग्रामस्थांनी दोन महिलांसह एका पुरुषाला विहिरीतून बाहेर काढले.

या घटनेत चोतराबाई पारधे (४५), सिमरन कांबळे (१८), सपना राजू राऊत (२५), ज्योती सरोदे (३५), सरस्वती बुरूड (२५), ताराबाई जाधव (३५), धुरपता जाधव (१८) यांचा समावेश आहे.


## समृद्धीवर अपघात
### एकाचा मृत्यू, एक गंभीर

■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. ४ :** समृद्धी महामार्गावर शुक्रवारी सकाळी झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाला तर त्याचा सहकारी जखमी झाला.

चिकू घेऊन जाणारे मालवाहू वाहन नागपूरकडे जात होते. यावेळी समोरील वाहनाला धडकून अपघात झाला. यात मालवाहू वाहनातील धनंजय गजानन तायडे याचा जागीच मृत्यू झाला. जखमीवर रूग्णालयात उपचार सुरू असून, पोलीस घटनेचा तपास करीत आहेत.

# पवारांकडून माहिती घेतली असती तर बरे झाले असते...

## प्रफुल्ल पटेलांचा राऊतांवर पलटवार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल हे अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचे हस्तक असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

त्यांच्या या आरोपामुळे राज्याचे राजकारण तापले असताना आता प्रफुल्ल पटेल यांनी राऊतांवर पलटवार केला आहे. माझ्यावर आरोप करण्यापूर्वी शरद पवारांकडून माहिती घेतली असती तर बरे झाले असते, असे ते राऊतांना टोला हाणताना म्हणालेत.

राज्यसभेत गुरुवारी मध्यरात्री वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले. तत्पूर्वी, या विधेयकावर सभागृहात प्रदिर्घ चर्चा करण्यात आली. त्यात प्रफुल्ल पटेल यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला. संजय राऊत यांनी वारंवार रंग बदलू नये, असे ते म्हणाले. त्यांची ही टीका जिव्हारी लागलेल्या राऊतांनी नंतर पटेलांवर सडकून टीका केली.

प्रफुल्ल पटेल यांच्यावर दाऊदच्या हस्तकांशी संबंध असल्याचे आरोप झालेत. ते दाऊदच्या संबंधांसह भाजपसोबत गेलेत. आता ते इतरांना निष्ठेच्या गोष्टी सांगणार आहेत का? मी त्यांचा इतिहास काढला तर त्यांना महाराष्ट्र सोडून जावे लागेल, असे ते पटेलांवर हल्ला चढवत म्हणाले.

पत्रकारांनी संजय राऊत यांच्या या टीकेविषयी प्रफुल्ल पटेल यांना छेडले असता त्यांनी केवळ एका वाक्यात उत्तर दिले.

माझ्या चारित्र्यावर व इतिहासावर बोलण्याआधी आपण पवार साहेबांकडून माहिती घेतली असती तर बरे झाले असते, असे ते म्हणाले. त्यांच्या या उत्तराचे राजकीय वतुर्ळात विविध अर्थ काढले जात आहेत. भाजप नेते विनोद तावडे यांनी यापूर्वी शरद पवारांवर दाऊद इब्राहिमशी संबंध असल्याचा आरोप केला होता.

# तपस्येला प्रणाम!



पाच दिवसांपूर्वी गुढीपाडव्याला दैनिक महासागरने ५४ वर्षे पूर्ण करीत ५५ व्या वर्षात पदार्पण केले. वर्षामागून वर्ष लोटली असली तरी महासागर अधिक तरूण आणि लोकाभिमूख होत चालला आहे. याचे श्रेय आहे ते चिरतरूण संस्थापक, संपादक श्रीकृष्ण चांडक यांना. ५४ वर्षातील ही वाटचाल खडतर असली तरी, आदर्श, तत्व, निष्ठा आणि मुल्यांशी कधीही व कोणतीही तडजोड न करता अपार कष्ट, परिश्रम, सचोटी, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर श्रीकृष्ण चांडक यांनी ही किमया साध्य केली आहे.

**मनोज बागडे**

वृत्तपत्र सुरू करणे फार सोपे आहे. मात्र, ते चालविणे अत्याधिक जिकरीचे काम आहे. मागील काही दशकांतील पाने चाळून पाहिली तर विविध राजकीय पक्षांच्या अनेक नेत्यांनी स्वतःचे वृत्तपत्र सुरू केले. तथापि, अल्पावधीत त्यांनी गाशा गुंडाळला. यापूर्वी नागपूर येथून सुरू झालेली कित्येक वृत्तपत्रे बंद पडलीत. खर्चाचा ताळमेळ बसविणे कठीण आहे. जाहिराती हा वृत्तपत्रांच्या अर्थार्जनाचा मुख्य स्त्रोत आहे. अनेक वृत्तपत्र वेगवेगळ्या माध्यमातून अर्थार्जन करीत असताना महासागर आणि श्रीकृष्ण चांडक यांनी ती वाट कधीही चोखाळली नाही. गेल्या काही वर्षात निवडणुका हा वृत्तपत्रांसाठी अर्थार्जनाचा एक मोठा ईव्हेंट झाल्याचे दिसून येते. अर्थात, काही वर्तमानपत्र याला अपवादही आहेत आणि त्या अपवाद असलेल्या वृत्तपत्रांच्या यादीत महासागरही आहे, हे छातीठोकपणे सांगता येवू शकते.

महासागर परिवाराच्या वतिने आयोजित बहुतेक कार्यक्रमांना नागपूरचे माजी आमदार आणि वनराईचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी अनेकदा उपस्थित असतात. या कार्यक्रमात प्रत्येकवेळी श्रीकृष्ण चांडक यांना महासागर चालविण्यासाठी कोणकोणत्या दिव्यातून जावे लागले? काय काय परिश्रम त्यांनी केलेत? याचा गिरीशजी आवर्जून उल्लेख करतात. नव्या पिढीतील पत्रकारांसाठी हे सारे अचंबित करणारे आणि अनाकलनीय असेच आहे.

वृत्तपत्र आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात मागील काही वर्षात अभूतपूर्व असे बदल झाल्याचे आपण सारेच पाहतो आहोत. आमचे एक पत्रकार मित्र सांगतात, त्याप्रमाणे अनेक वृत्तपत्राच्या मालकांनी त्यांच्याकडे कार्यरत पत्रकारांच्या खिशातील पेन काढून टाकला आहे आणि चाकू दिला आहे... खिसे कापण्यासाठी. आताशा समाज माध्यमांच्या दुनियेत पोर्टलचे तर उदंड पीक उगवले आहे. गल्लीबोळीत हातात दंडूके आणि मोबाईल फोन घेवून पत्रकारांच्या टोळ्या धुडगूस घालताना दिसताहेत. श्रीकृष्णजी चांडक नेहमी सांगतात, पत्रकार बना... पत्रावळीकार नको... दुर्दैवाने, आज पत्रावळीकारांची संख्या वाढली आहे.

या क्षेत्रात हे असे बदल होत असताना, आदर्श, नितीमुल्य, तत्वांना तिलांजली दिली जात असताना श्रीकृष्ण चांडक यांनी मात्र या तत्वांशी कधीही तडजोड केली नाही. प्र. के. अत्रे हे श्रीकृष्ण चांडक यांचे प्रेरणास्थान. विविध विषयांवरचा त्यांचा दांडगा अभ्यास असल्याने ते तितक्याच चांगल्या प्रकारे शब्दांचे फटकारे लगावू शकतात. त्यामुळेच की काय, श्रीकृष्ण चांडक यांचे 'खरीखरी' हे सदर आजही तितकेच वाचकप्रिय आहे.

महासागर सुरू झाल्यानंतर अनेक वर्षे केवळ विदर्भाच्या ११ जिल्ह्यांपुरता मर्यादित राहिला. नवीन आवृत्या सुरू करणे गोवर्धन पर्वत पेलण्यापेक्षा कमी नाही. मात्र, श्रीकृष्ण चांडक यांनी हे आव्हानही लिलया पेलले. विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यात त्यांनी स्वतंत्र आवृत्या सुरू करण्याबरोबरच थेट नाशिक, मुंबई आणि पालघरपर्यंत झेप घेतली. त्या भागात महासागरने वाचकांमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

महासागरचा ५४ वर्षाचा हा प्रवास निश्चितच सोपा नव्हताच. पण, जे कठीण आहे त्याला आव्हान म्हणून स्वीकारत ध्येयापर्यंत पोहचणार नाही, विजयश्री मिळविणार नाही, ते श्रीकृष्ण चांडक कसले? त्यांच्या कठीण तपस्येचा बळावर हे यश साध्य करता आले आहे. या परिश्रमाला आणि तपस्येला प्रणाम तर करावाच लागले. महासागरच्या यशस्वी वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा...!!

















